इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे,

कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर

अर्थशास्त्र विभाग

विद्यार्थी सूचना

दिनांक :- 11/01/2023

अर्थशास्त्र विभागातील सर्व विद्यार्थ्यांना सुचित करण्यात येते की शैक्षणिक वर्ष 2022- 23मध्ये **"अर्थबोध"** अंतर्गत **"स्वयंरोजगाराच्या वाटा"** हे पुस्तक प्रकाशित करण्यात येणार आहे. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी आपले शोधनिबंध डॉ. तानाजी कसबे यांच्याकडे दिनांक 24/01/2024 पर्यंत जमा करावेत.

Head
Department of Economics
A.S.C.College,Indapur,
Dist.Pune.413106

प्राचार्य
PRINCIPAL
ARTS. SCIENCE AND
COMMERCE COLLEGE
INDAPUR-413106-DIST-PUNE

इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे,

कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर

अर्थशास्त्र विभाग

2022-2023

अहवाल

**"अर्थबोध"** अंतर्गत

**"स्वयंरोजगाराच्या वाटा"**

अर्थशास्त्र विभागाच्या वतीने बी.जी. चव्हाण यांच्या स्मृती प्रित्यर्थ एकूण 17 विद्यार्थ्यांचे केलेले विषय आले विभागातील प्राध्यापकांनी स्वयंरोजगार कोणकोणत्या असू शकतात आपल्या मोठे मोठे अनेक रोजगार आहे त्याची जाणीव विद्यार्थी वर्गात निर्माण करून दिली संशोधन विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन करते अनेक विद्यार्थ्यांनी च्या स्वयंरोजगाराच्या फायदा तोट्याचे गणित शोधण्यास सांगण्यात आले रोजगार या विषयाचा प्रमुख हेतू आहे खरोखरच विद्यार्थ्यांनी देखील या उपक्रमात चांगला विद्यार्थ्यांना आपण सुद्धा स्वयंरोजगार करू शकतो याबाबत आत्मविश्वास निर्माण झाला हा अर्थ बोध इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री. हर्षवर्धन पाटील यांच्या शुभहस्ते प्रकाशित करण्यात आला होता या कार्यक्रमाचे प्रा. डॉ. भीमाजी भोर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. शाम सातार्ले यांनी केले. आणि कार्यक्रमाचे आभार प्रा. कसबे सर यांनी केले.

Head
Department of Economics
A.S.C.College,Indapur,
Dist.Pune.413106

प्राचार्य
PRINCIPAL
ARTS. SCIENCE AND
COMMERCE COLLEGE
INDAPUR-413106-DIST-PUNE

इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे,

कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर

अर्थशास्त्र विभाग 2022-2023

अहवाल

**“अर्थबोध”** अंतर्गत **“स्वयंरोजगाराच्या वाटा”**

**फोटो**







प्राचार्य
**PRINCIPAL**
ARTS. SCIENCE AND
COMMERCE COLLEGE
INDAPUR-413106·DIST-PUNE





" विद्या परम् दैवतम् "

# इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, इंदापूर

ता.इंदापूर जि.पुणे

अर्थशास्त्र विभाग

# अर्थबोध

अंक ४ था
२०२२-२३

## स्वयंरोजगाराच्या वाटा


















कै.प्रा.बी.जी.चव्हाण स्मृती विद्यार्थी अर्थशास्त्र परिषद




Indapur Weekly Market Survey

Reshim Udyog Visit













RBI Visit

Market Visit





# शुभसंदेश

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय इंदापूर येथील अर्थशास्त्र विभागाकडून विद्यार्थ्यांसाठी सतत अनेक नवनवीन उपक्रम राबवले जात असतात. कै. प्रा. बी. जी. चव्हाण स्मृती विद्यार्थी अर्थशास्त्र परिषदेच्या माध्यमातून **"स्वयंरोजगाराच्या वाटा"** हे पुस्तक प्रकाशित करत आहोत याचा मला विशेष आनंद वाटतो.

आज, मला आपल्या एका महत्त्वाच्या पैलूवर लक्ष द्यायचे आहे-स्वयं-रोजगार. सतत विकसित होत असलेल्या जगात, स्वयंरोजगाराची दिशा व्यक्तींना त्यांचे नशीब घडवण्याचा मार्ग म्हणून केंद्रस्थानी असते.

स्वयंरोजगार म्हणजे केवळ नोकरी नव्हे; हा एक प्रवास आहे, स्वातंत्र्य स्वाभिमान आणि सर्जनशीलतेच्या क्षेत्रात एक उपक्रम आहे. स्वयंरोजगाराची दिशा उत्कटतेचा पाठपुरावा, जोखीम स्वीकारण्याचे धैर्य आणि आव्हानांवर मात करण्याची लवचिकता याद्वारे चिन्हांकित केली जाते.

या दिशेला प्रवास करत असताना, नावीन्याची भावना आत्मसात करूया. उद्योजकीय क्षेत्रात, नावीन्य हे केवळ ग्राउंडब्रेकिंग तंत्रज्ञानापुरतेच नाही; हे नवीन उपाय शोधणे, मूल्य निर्माण करणे आणि बदलत्या परिस्थितीशी जुळवून घेणे याबद्दल आहे. ही प्रेरक शक्ती आहे जी स्वयंरोजगार असलेल्या व्यक्तींना पुढे नेते.

शिवाय, स्वयंरोजगाराची दिशा आजीवन शिक्षणाच्या संकल्पनेशी जोडलेली आहे. वेगाने बदलणाऱ्या जगात, नवनवीन कौशल्ये आत्मसात करण्याची आणि परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता आवश्यक आहे. या वृत्तीमुळे आपल्या क्षमता तर वाढतातच पण अनपेक्षित संधींचे दरवाजे देखील उघडतात.

शेवटी, लवचिकतेचे महत्त्व ओळखू या. स्वयंरोजगाराचा मार्ग अनेकदा अडथळे आणि अनिश्चिततेने भरलेला असतो. परत उडी मारण्याची, अपयशातून शिकण्याची आणि टिकून राहण्याची आपली क्षमता आहे जी आपल्या यशाची व्याख्या करते.

शेवटी, स्वयंरोजगाराची दिशा ही एक गतिमान, परिवर्तनशील प्रवास आहे. हे नाविन्य आत्मसात करणे, आजीवन शिक्षणासाठी वचनबद्ध करणे, सहकार्य वाढवणे आणि लवचिकता मूर्त रूप देणे याबद्दल आहे. आपण या मार्गावर प्रवास करत असताना, आपण केवळ आपले नशीबच आकारू नये तर अधिक उत्साही आणि उद्योजक समाजासाठी योगदान देऊया.

या अर्थशास्त्र परिषदेच्या निमित्ताने प्रकाशित होणाऱ्या **"अर्थबोध"** या **"स्वयंरोजगाराच्या वाटा"** या विषयावर आधारित विद्यार्थ्यांचे साहित्य लेखन प्रकाशित होत आहे सर्व विद्यार्थ्यांचे मी संस्थेचा अध्यक्ष म्हणून विशेष अभिनंदन करतो या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सर्व प्राध्यापकांचे हार्दिक अभिनंदन करतो. या विद्यार्थी परिषदेला व भविष्यात यशस्वी उद्योजक होण्याकरता हार्दिक शुभेच्छा!

धन्यवाद.

श्री. हर्षवर्धनजी पाटील

अध्यक्ष

इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळ, इंदापूर



# मा. प्राचार्यांचे मनोगत

आज आपला देश 34 वर्षानंतर नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 ची अंमलबजावणी करीत आहे. 21 व्या शतकातले हे पहिले परिवर्तनात्मक धोरण असून कौशल्यावर आधारित व्यवसायाभिमुख खुले शिक्षण देण्याचा शासनाचा मानस आहे. याची अंमलबजावणी करण्यासाठी इंदापूर पंचक्रोशीतील व शेजारील तालुक्यातील ग्रामीण भागातील युवकांना रोजगाराच्या वाटा उपलब्ध करून देण्याचे काम माजी मंत्री, मा. हर्षवर्धनजी पाटील साहेबांच्या कल्पक नेतृत्वातून साकार होत आहे. त्याचाच भाग म्हणून प्रधानमंत्री कौशल्य योजना 2024 च्या माध्यमातून विविध कौशल्य आधारित 25 अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी मा. श्री. हर्षवर्धनजी पाटील साहेब प्रयत्नशील आहेत. तसेच महाराष्ट्र राज्याच्या कौशल्य विभागाच्या माध्यमातून 10 अभ्यासक्रम सुरू करीत आहोत. इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. हर्षवर्धनजी पाटील साहेब यांच्या संकल्पनेतून महाविद्यालयातील 50 प्राध्यापकांनी 50 मूल्यवर्धित रोजगाराभिमुख अभ्यासक्रम तयार करून विद्यार्थ्यांना **स्वयंरोजगाराच्या वाटा** उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

त्याचीच प्रचिती "**अर्थबोध**" या संशोधन पत्रिकेच्या विषयावरून येते. अर्थशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. भिमाजी भोर व सहकारी प्राध्यापकांनी **अर्थबोध** या संशोधन पत्रिकेचा विषय **"स्वयंरोजगाराच्या वाटा"** या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या संशोधनात्मक सुप्त गुणांना एक प्रकारे नव संजीवनी उपलब्ध करून दिलेली आहे. ग्रामीण व गाव गाड्यातला विद्यार्थीही तुलनेने अधिक संधी सुविधा उपलब्ध असलेला शहरी विद्यार्थ्यांना सरस ठरत आहे. हेच या पत्रिकेमधील संशोधकाच्या संशोधनावर स्पष्ट होते. अगदी चमडी व्यवसायापासून ते डिजिटल, कॉम्प्युटर अशा विविध व्यवसायावर चिकित्सक व अभ्यासपूर्ण संशोधन विद्यार्थ्यांनी केलेले आहे, असे स्पष्ट होते. तसेच मा. श्री हर्षवर्धनजी पाटील साहेब यांच्या कल्पक नेतृत्वाचा अभिमान वाटतो व संस्थेत कार्य करत असल्याचा गौरव वाटतो. अर्थशास्त्र विभागातील सर्व प्राध्यापकांचे व विद्यार्थ्यांचे मनपूर्वक अभिनंदन शुभेच्छा .


डॉ. जीवन सरवदे

प्राचार्य

कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय इंदापूर



# " संपादकीय मनोगत "

अर्थशास्त्र विभागामार्फत शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबवले जातात. अर्थबोध पत्रिकेचा चौथा अंक प्रसिद्ध करताना मला विशेष आनंद होत आहे. वर्ष 2022 23 मध्ये विद्यार्थ्यांसाठी अर्थशास्त्र विभागाने ग्रंथालय सुविधा देणे, विद्यार्थ्यांना स्वागत समारंभ व निरोप समारंभाचे नियोजन करण्यासाठी प्रवृत्त करणे आणि त्याचे नियोजन करणे. तसेच विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सहलींचे आयोजन करणे, आर्थिक व सामाजिक सर्वेक्षण करणे, विविध प्रदर्शनास भेटी देणे, आठवडा बाजाराचे सर्वेक्षण करणे, विद्यार्थ्यांना अर्थशास्त्राशी संबंधित लिखाण लिहिण्यास प्रवृत्त करणे असे विविध उपक्रम राबविले जातात.

अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थ्यांनी अध्यापन केवळ गुण मिळविण्यासाठी न करता प्रत्यक्ष समाजात जाऊन अभ्यास केला पाहिजे. काहीतरी स्वयंरोजगार शोधला पाहिजे स्वयंरोजगाराचे विविध मार्ग असतात याबाबत विद्यार्थी वर्गात जाणीव निर्माण करून देणे. त्यास अनुसरून वर्ष 2022 - 23 मध्ये "स्वयंरोजगाराच्या वाटा" हा विषय विद्यार्थ्यांना देण्यात आला. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अनेक लोक बेरोजगार झाले अशावेळी नोकरी न शोधता स्वयंरोजगार निर्माण करावा यासाठी स्वयंरोजगाराच्या वाटा हा विषय निवडण्यात आला आहे. "अर्थबोध" या अंकासाठी लिखाण करण्यास विद्यार्थ्यांना प्रवृत्त करण्यात आले.

अर्थशास्त्र विभागातील प्राध्यापकांनी स्वयंरोजगार कोण कोणते असू शकतात, आपल्या आसपास छोटे-मोठे अनेक स्वयंरोजगार आहेत याची जाणीव विद्यार्थी वर्गात निर्माण करून देण्यात आली. संशोधन कसे करावे? एखादा विषय कशाप्रकारे मांडावा? त्याचे लिखाण कसे करावे? याबाबत विभागातील प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना सखोल मार्गदर्शन केले. त्यास अनुसरून अनेक विद्यार्थ्यांनी स्वयंरोजगाराचे विषय निवडले. अशा स्वयंरोजगाराच्या फायदा तोट्याचे गणित शोधण्यास सांगण्यात आले. अशाच प्रकारचे स्वयंरोजगार आपण सुद्धा करू शकतो, याबाबत विद्यार्थी वर्गात जाणीव निर्माण करून देण्यात आली. अशा प्रकारचे स्वयंरोजगार आपण सुद्धा करू शकतो, याबाबत विद्यार्थ्यांमध्ये सुद्धा आत्मविश्वास निर्माण करून देणे. हा "स्वयंरोजगाराच्या वाटा" या विषयाचा प्रमुख हेतू आहे. खरोखरच विद्यार्थ्यांनी देखील या उपक्रमास चांगला प्रतिसाद दिला विद्यार्थ्यांना आपण सुद्धा स्वयंरोजगार करू शकतो याबाबत आत्मविश्वास निर्माण झाला. तशा प्रकारचे मत अनेक विद्यार्थ्यांनी व्यक्त केले आहे. विद्यार्थी वर्गास स्वयंरोजगाराच्या वाटा या विषयाचा त्यांच्या वैयक्तिक जीवनात नक्कीच फायदा होईल याचा आत्मविश्वास वाटतो.

विभागातील प्राध्यापक वर्ग विद्यार्थ्यांसाठी नवनवीन उपक्रम राबविण्यात नेहमीच उत्साही असतात. त्यामुळेच "अर्थबोध" हा अंक निघत आहे याचा मला सार्थ अभिमान आहे.

धन्यवाद.

डॉ. भिमाजी भोर,
अर्थशास्त्र विभाग प्रमुख.

**Indapur Taluka Shikshan Prasarak Mandals,**
**Arts, Science and Commerce College, Indapur**

## Department of Economics

# Arthbodh (Book)
**Under**
# Ways of Self employment

2022 – 23

Place of Publication : Arts, Science and Commerce College, Indapur

Late Prof. B.G. Chavan memorable 4th Student Research Conference



| | |
|---|---|
| Co- Editor<br>**Dr. Bhimaji Bhor**<br>Head, Dept. Of Economics<br>ASC College, Indapur, Pune(MS) | Editor<br>**Dr. Jeevan Sarwade**<br>Principal<br>ASC College, Indapur, Pune (MS) |
| Editorial Board | |
| **Dr. Tanaji Kasbe**<br>Assistant Professor<br>ASC College, Indapur, Pune(MS) | **Dr. Gajanan Kadam**<br>Assistant Professor<br>ASC College, Indapur, Pune(MS) |
| **Mr. Amol Sarde**<br>Assistant Professor<br>ASC College, Indapur, Pune(MS) | **Mrs. Akabai Shriram**<br>Assistant Professor<br>ASC College, Indapur, Pune(MS) |
| **Mr. Amol Thorat**<br>Assistant Professor<br>ASC College, Indapur, Pune(MS) | **Student Organizing Committee**<br>Miss. Megha Shinde<br>Mr. Akash Sawant<br>Mr. Dattatrya Bansode<br>Miss. Harhala Redekar |

# अनुक्रमणिका


| अ.क. | संशोधकाचे नाव | संशोधकाचे विषय | पृष्ठ क. |
| --- | --- | --- | --- |
| 1. | मेघा मधुकर शिंदे | विघ्नेश डिजीटल फोटो स्टृडिओ : स्वयंरोजगाराचे साधन | 1 |
| 2. | आकाश गजानन सावंत | वैष्णवी कॉम्प्युटर ॲन्ड टायपिंग सेंटर, अकलूज एक स्वयंरोजगार | 8 |
| 3. | दत्तात्रय अर्जुन बनसोडे | बेरोजगारीवर मात करण्यासाठी शेतीपुरक व्यवसाय दुध संकलन एक स्वयंरोजगार | 11 |
| 4. | हर्षला सौदागर रेडेकर | कुक्कट पालन व्यवसाय — स्वयंरोजगाराचे माध्यम | 14 |
| 5. | कामिनी कल्याण कडाळे | स्वयंरोजगाराचे माध्यम : शेळीपालन व्यवसाय | 18 |
| 6. | काजल विनायक शिंदे | चैतन्य चमडी व्यवसाय : स्वयंरोजगार निर्मितीचे साधन | 23 |
| 7. | मोहन नवनाथ चव्हाण | बिजवडी खेडेगावातील हॉटेल व्यवसायीकांचा अभ्यास | 27 |
| 8. | *नगरे शितल सुनिल* | *मत्स्यव्यवसायातून स्वयंरोजगार निर्मिती* | 30 |
| 9. | सागर दिपक बनकर | अंबिका केटर्स रोजगार निर्मितीचा प्रभावी मार्ग | 34 |
| 10. | सत्यवान गणेश कोरे | ज्युस सेंटर : एक स्वयंरोजगाराची संधी | 38 |
| 11. | सोनाली अमृत इंगोले | मोहन मोबाईल शॉपी स्वयंरोजगार निर्मितीचे साधन | 41 |
| 12. | तुषार लक्ष्मण जगताप | झेरॉक्स सेंटर - एक स्वयंरोजगाराची संधी | 45 |
| 13. | गणेश लक्ष्मण ढोले | गिरझणी गावातील पान शॉप व्यवसाय स्वयंरोजगार निर्मितीचे एक साधन | 48 |
| 14. | चेतन सर्जेराव चव्हाण | अण्णा लसून सोलणी केंद्र स्वयंरोजगाराचे एक माध्यम | 51 |
| 15. | आनंद शामराव बनसोडे | किराणा व्यवसायातुन स्वयंरोजगाराची संधी | 54 |
| 16. | तुषार किसन जाधव | कृषी क्षेत्रातील स्वयंरोजगाराच्या संधी | 58 |
| 17. | चव्हाण ज्योती वसंत | स्वयंरोजगार निर्मितीत बेकरी व्यवसायाची भुमिका | 63 |

# विघ्नेश डिजीटल फोटो स्टूडिओ : स्वयंरोजगाराचे साधन

**मेघा मधुकर शिंदे**
**एम.ए. २ अर्थशास्त्र**
**मो. नं. ९५११९३०५१०**

**प्रस्तावना:**

भारतीय अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान व मिश्र अर्थव्यवस्था आहे. भारत हा विकसनशील देश असून विकसित होण्यासाठी भारतातील जनतेला रोजगार उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्यासाठी रोजगार निर्मिती, स्वयंरोजगार, लघु व कुटीरोद्योग इत्यादी वर भर देणे आवश्यक आहे. भारतामध्ये बेरोजगारीचा प्रश्न दिवसेंदिवस वाढत आहे.त्यामुळे स्वयंरोजगार निर्माण करणे आवश्यक आहे. राष्ट्रीय सांख्यिकी आयोगाच्या अहवालानुसार बेरोजगारीचा दर २०१७—१८ मध्ये ६.१ % टक्के होता. शहरी भागात हे प्रमाण सर्वाधिक ७.८% होता. तर ग्रामीण भागात बेरोजगारीचे प्रमाण ५.३% टक्के होते. वाढत्या बेरोजगारीमुळे स्वयंरोजगाराची गरज भासु लागली स्वयं रोजगारामध्ये एक व्यक्ती जो स्वत:ची नोकरी घेतो. व तो व्यवसायाचा मालक असतो, तसेच तो प्राथमिक /एकमेव ऑपरेटर देखील असतो. स्वयंरोजगार असलेल्यांना लागू कर आकारणेचे नियम हे कर्मचारी किंवा व्यवसायाच्या मालकापेक्षा वेगळे असतात.

ग्रामीण युवकांमध्ये कौशल्यांची निर्मिती करण्यासाठी सुशिक्षित तरूणांना स्वयंरोजगार आणि रोजगाराची संधी देण्यासाठी "ट्रेनिंग ऑफ रूरल युथ फॉर सेल्फ एम्प्लॉयमेंन्ट"(TRYSEM स्थापना १५ ऑगस्ट, १९७९) नामक विशेष योजनेची अंमल बजावणी केली आहे. ग्रामीण भागातील तरूणांना स्वयंरोजगाराची संधी मिळण्यासाठी हा कार्यक्रम अत्यंत उपयुक्त ठरला.

स्वयंरोजगारामध्ये डिजीटल फोटोग्राफी हे एक स्वयंरोजगाराचे एक साधन आहे. सन १८०० मध्ये कॅमेरा ही संकल्पना उदयास आली. सन १८०० मध्ये फोटोग्राफीचा शोध थॉमस वेडवुझ या शास्त्राज्ञाने लावला. १८३९ च्या दरम्यान व्यवसायिक फोटोग्राफीचा/ छायाचित्रकलेचा जन्मा झाला. १९ ऑगस्ट हा दिवस जागतिक फोटोग्राफी दिन म्हणून साजरा केला जातो. सन १९ ऑगस्ट १८३९ साली फ्रेंच सरकारने फोटोग्राफीचे पेटंट विकत घेऊन जगाला मुक्त केले.

इलेक्टॉनिक्स डिजीटल कॅमेरा १९९० मध्ये जन्माला आला. त्यानंतर सातत्याने डिजीटल कॅमेरामध्ये बदल/उत्क्रांती होत आहे. सन २००७ मध्ये सेलफोनमध्ये डिजीटल कॅमेरे

समाविष्ट करण्यात आले. सन २०१० मध्ये डिजीटल पॉईंट अॅन्ड शुट आणि DSLR कॅमेरा स्वरूपातून स्पर्धा चालू आहे.

✓ **व्याख्या:**

**१)"स्वयंरोजगार":**

स्वयंरोजगार म्हणजे एखादी व्यक्ती विशिष्ट नियोकत्यासाठी काम करीत नाही, जो त्यांना सतत वेतन देतो, स्वयंरोजगार व्यक्ती किंवा स्वतंत्र कंत्राटदार, थेट व्यापार किंवा व्यवसायाद्वारे करार केल्यास उत्पन्न कमवतात. त्यास स्वयंरोजगार असे म्हणतात.

**२) फोटोग्राफी:**

"उज्जवल ऊर्जोच्या कृतीद्वारे आणि विशेषत: संवेदनशील पृष्ठभागवार प्रकाशाद्वारे प्रतिमा तयार करण्याची कला किंवा प्रक्रिया म्हणजे फोटोग्राफी होय". — फॉग रॅफी

**उद्‌देश :**

१. डिजीटल फोटोग्राफीचे नाविण्य अभ्यासणे.

२. डिजीटल फोटोग्राफीचे स्वयंरोजगारातील योगदान अभ्यासणे.

३. सद्य:स्थितीतील फोटोग्राफीचे परिणाम अभ्यासणे.

४. डिजीटील फोटोग्राफीची स्वयंरोजगारातील रोजगार निर्मिती अभ्यासणे.

**संशोधन पध्दती :**

**'विघ्नेश डिजीटल फोटो स्टृडिओ'** स्वयंरोजगाराचे साधन या अभ्यास पध्दतीसाठी प्राथमिक व दुय्यम पध्दतीचा अभ्यास केला आहे.

**विश्लेषण:**

**विघ्नेश डिजीटल फोटो स्टृडिओ स्वयंरोजगाराचे एक साधन :**

स्वयंरोजगार फोटोग्राफीमध्ये फोटोग्राफरांना कॅमेरा घेताना आपण कोणत्या प्रकारचे काम करतो, फोटो सर्वात मोठा किती साईज मध्ये करावा लागतो. कोणत्या ठिकाणी काम करता, अंदाजे झूम किंवा वाईड लेसरची गरज किती आहे. हे लक्षात घ्यावे लागते. फोटोग्राफी व्यवसायामध्ये कमीत कमी तीन कामगारांची गरज असते. त्या कामगारांना व्हिडीओ कॅमेरा, फोटो कॅमेरा, कॉम्प्युटर ऑपरेटर याचे ज्ञान असणे आवश्यक असते.

तक्ता क्रमांक — १

**डिजीटल फोटोग्राफी कॅमेरा आणि प्रिंटर कंपनी किंमतीचे वर्गीकरण**

| अ. क्र. | कॅमेरा /प्रिंटर कंपनीचे नाव | किंमत |
|---|---|---|
| १ | पॅनासोनिक HC-PV 100 GD व्यावसायिक कॅमकॉर्डर | ७५,३००/— |
| २ | निकॉन डी 7100 24-1 MP डिजीटल SLR | ९४,४५०/— |
| ३ | पॅनासोनिक HDC – MDH 1 व्यावसायिक व्हिडीओ | ६९,९००/— |
| ४ | कॅनॉन EOS 200 D (१८—५५ मिमी) SSM लेन्स | ३७,५२५/— |
| ५ | इप्सॉन L805 सिंगल फंक्शन वायरलेस इंक टॅक कलर फोटो प्रिंटर | १७,९४९— |

संदर्भः https://www.amazon.in, https://www.pricedekho.com

तक्ता क्रमांक १ ध्ये पॅनोसोनिक HC-PV 100 GD हा व्यावसायिक कॅमकॉर्डर कॅमेरा आहे. त्यांची किंमत ७५,३००/— आहे. हा व्हिडीओ कॅमेरा लग्न, साखरपुडा, वाढदिवस पार्टी, नामकरण/बारसे तसेच विविध प्रकारचे सांस्कृतिक कार्यक्रमासाठी आवश्यक असतो. कॅनॉन EOS 200 D (१८—५५ मिमी) SSM लेन्ससह या कॅमेऱ्यांची किंमत ३७,५२५/— रूपये आहे. या कॅमेऱ्यामुळे झुम कमी जास्त करता येते.

फोटोग्राफीमध्ये कलर फोटो प्रिंटर हा महत्वपुर्ण घटक आहे. इप्सॉन L805 सिंगल फंक्शन वायरलेस इंक टॅक कलर फोटो प्रिंटर याची किंमत १७,९४९/— आहे.

**तक्ता क्र. २**

**डिजीटल फोटोग्राफीचे फोटो आकारमानानुसार दरपत्रकाचे वर्गीकरण**

| अ.क्र | फोटो साईज | प्रति नग संख्या | किंमत |
|---|---|---|---|
| 1 | 4”x6” | 1 | 5.83/- |
| 2 | 5” x7” | 1 | 70/- |
| 3 | 6”x 8” | 1 | 100/- |
| 4 | 8”x10” | 1 | 150/- |
| 5 | 8”x12” | 1 | 180/- |
| 6 | 10” x 12” | 1 | 225/- |
| 7 | 10” x 15” | 1 | 250/- |
| 8 | 12”x15” | 1 | 250/- |

| | | | |
|---|---|---|---|
| 9 | 12”x15” | 1 | 300/- |
| 10 | 12”x18” | 1 | 330/- |
| 11 | 16”x20” | 1 | 320/- |
| 12 | 16”x24” | 1 | 400/- |
| 13 | 20”x24” | 1 | 400/- |

**संदर्भ : कलासंगम फोटो स्टूडिओ माळीनगर ता. माळशिरस जि. सोलापूर**

**तक्ता क्रमांक ३**

**डिजीटल फोटोअल्बमचे वर्गीकरण**

| अ. क्र. | अल्बमचे नाव | साईज | प्रति नग | किंमत |
|---|---|---|---|---|
| १ | करिजमा अल्बम | 12”x36” | १ पान | ५५० |
| २ | फोटो बुक अल्बम | 12”x36” | १ पान | ६०० |
| ३ | नॉन टेरीबल अल्बम | 12”x36” | १ पान | ७०० |
| ४ | बेलवेट अल्बम | 12”x36” | १ पान | ८५० |

**संदर्भ : कलासंगम फोटो स्टुडिओ माळीनगर, ता. माळशिरस जि. सोलापूर**

**उदा: करिजमा अल्बम:**

हा अल्बम कमीत कमी २० पाने व जास्तीत जास्त २५ ते ३५ पाने असतो. एका पानाची किंमत ५५०/— आहे या अल्बमची विक्री किंमत २०,०००/— रुपये आहे. त्या होणारा खर्च १४,०००/— त्यापासून मिळणारा निव्वळ नफा ६,०००/— रूपये मिळतो. या अल्बम प्रमाणे वरील वेगवेगळया किंमतीप्रमाणे किंवा पानाच्या वर्गीनुसार नफा जास्त किंवा कमी मिळातो.

**तक्ता क्रमांक ४**

**व्हिडीओ शुटिंग दराचे प्रकारानुसार वर्गीकरण**

| अ. क्र. | प्रकार | विक्री किंमत | खर्च | निव्वळ नफा |
|---|---|---|---|---|
| १ | HD | १०,०००/— | १५००/— | ८५००/— |
| २ | 4 K | १२,०००/— | १२००/— | १०,८००/— |
| ३ | S D | ७,०००/— | १५००/— | ५,५००/— |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | Blu Re | १८,०००/— | ३०००/— | १५,०००/— |

संदर्भ : कलासंगम फोटो स्टुडिओ माळीनगर, ता. माळशिरस जि. सोलापूर

**तक्ता क्र. ४ नुसार ब्लु रे या विडिओ शुटिंगची विक्री किंमत १८०००/— रूपये आहे. तर त्यासाठी येणार खर्च ३०००/— रूपये असून मिळणारा नफा १५०००/— रू. आहे. तसेच एच. डी. व्हिडीओ शुटिंगची विक्री किंमत १००००/— रूपये आहे. तर त्यासाठी येणार खर्च १५००/— रूपये असून मिळणारा नफा ८५००/— रू. आहे. ४ के व्हिडीओ शुटिंगची विक्री किंमत १२०००/— रूपये आहे. तर त्यासाठी येणार खर्च १२००/— रूपये असून मिळणारा नफा १०८००/— रू. आहे. एस. डि. या व्हिडीओ शुटींगची विक्री किंमत ७,०००/— रूपये आहे. तर त्यासाठी येणार खर्च १५००/— रूपये असून मिळणारा नफा ५,५००/— रू. आहे. ब्लु रे हे व्हिडीओ शुटींग जास्त प्रसिध्द आहे.**

- **विघ्नेश डिजीटल फोटो स्टूडिओ स्वयंरोजगारातील स्थिर व बदलता खर्च**

विघ्नेश डिजीटल फोटोग्राफी या स्वयंरोजगार व्यवसायामध्ये सुरूवातीला दिर्घकाळासाठी मोठया प्रमाणात गुंतवणुक (स्थिर खर्च) करावा लागतो. त्यानंतर फक्त बदलता खर्च करावा लागतो.

**तक्ता क्र. ५**

**विघ्नेश डिजीटल फोटो स्टूडिओ मटेरीयल खर्च खालीलप्रमाणे**

| अ. क्र. | तपशिल | रक्कम रूपये |
|---|---|---|
| १ | जागा स्वत:ची/भाडयाने | |
| २ | व्हिडीओ कॅमेरा आणि फोटा कॅमेरा | २,७७,१७५/— |
| ३ | कॉम्प्युटर | ७५,०००/— |
| ४ | फर्निचर | ३०,०००/— |
| ५ | प्रिंटर | १७,९४९/— |
| ६ | फ्लॅश, ट्रॉयफॉड, स्टुडिओ लाईटस | ६५,०००/— |
| ७ | लाईट बिल | १५००/— |
| | **एकुण स्थिर खर्च** | **४,६६,६२४/—** |
| | **बदलता खर्च** | **३५%** |

तक्ता क्र. ५ नुसार विघ्नेश डिजीटल फोटो स्टृडिओ या व्यवसायासाठी एकुण स्थिर खर्च वरील तक्त्याप्रमाणे ४,६६,६२४/— रू. आहे. तर बदलता खर्च हा एकुण खर्चाच्या ३५ टक्के आहे.

**विघ्नेश डिजीटल फोटो स्टृडिओ व्यवसायाचे फायदे:**

१. सुशिक्षित युवकांसाठी आधुनिक पध्दतीचा व्यवसाय आहे.

२. या व्यवसायामध्ये सातत्याने नाविन्यपुर्ण बदल होत असतात.

३. विघ्नेश डिजीटल फोटो स्टृडिओ व्यवसाय दिर्घकाळामध्ये भरपूर नफा मिळवून देणारा आहे.

४. विघ्नेश डिजीटल फोटो स्टृडिओ व्यवसायामध्ये ऑनलाईन माहितीच्या आधारे फोटोग्राफीमध्ये नाविन्य आणता येते.

५. विघ्नेश डिजीटल फोटो स्टृडिओ व्यवसायामध्ये बदलता खर्च कमी आहे.

६. विघ्नेश डिजीटल फोटो स्टृडिओ व्यवसायामध्ये थेट ग्राहकांशी संपर्क केला जातो.

**विघ्नेश डिजीटल फोटो स्टृडिओ व्यवसायाच्या समस्या:**

१. विघ्नेश डिजीटल फोटो स्टृडिओ व्यवसायासाठी सुरूवातीस स्थिर खर्चाची गुंतवणुक मोठया प्रमाणात करावा लागतो.

२. विघ्नेश डिजीटल फोटो स्टृडिओ व्यवसायासाठी लाईट (विजेची) गरज असते. (लाईट प्राब्लेम) वीज खंडीत झाल्यास असल्यास कोणतेही काम पुर्ण होत नाही.

३. या व्यवसायामध्ये कार्यक्रम ज्या ठिकाणी आहे ते रात्र—दिवस जाऊन काम करावे लागते. त्यामुळे प्रवासी खर्चात वाढ होण्याची शक्यता असते.

४. हा व्यवसाय शहराच्या/पर्यटन ठिकाणी मोठया प्रमाणात चालतो. खेडयामध्ये या व्यवसायास कमी प्रमाणात वाव असतो.

**विघ्नेश डिजीटल फोटो स्टृडिओ व्यवसायासाठी भांडवलाचे स्त्रोत कर्ज योजना:**

१. मायक्रो युनिटस डेव्हलमेंट अॅन्ड रिफायनान्य एजन्सी लिमिटेड (मुद्रा बॅक योजना)

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मुद्रा बॅक योजना ८ एप्रिल, २०१५ रोजी कार्यान्वित केली. या योजनेनुसार कोणत्याही प्रकारचे तारण किंवा जामिनाराशिवाय होतकरू बेरोजगार यांना कर्जपुरवठा करून त्यांचे जीवनमान उंचविण्यासाठी केंद्रशासनाच्या मुद्रा योजनेंतर्गत अर्थसहाय्य देण्यात येते. तरूणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात आणि त्यातून उद्योजक निर्माण व्हावेत, या हेतूने पंतप्रधानाच्या संकल्पनेतून केंद्र शासनाने मुद्रा बॅक योजना सुरू केली. हा सुशिक्षित बेराजगारांसाठी उद्योजक बनविण्याचा राजमार्ग आहे.

या योजनेंतर्गत बेरोजगारांना कर्ज पुरवठा करण्यासाठी तसे व्यवसायासाठी प्रोत्साहित करण्यासाठी खालील तीन गटात वर्गीकरण करण्यात आले आहे.

१. शिशु गट : रू. १०,०००/— ते ५०,०००/—

२. किशोर गट : रू. ५०,०००/— ते ५ लाख

३. तरूण गट : रू. ५ लाख ते १० लाख.

**निष्कर्ष:**

१. विघ्नेश डिजीटल फोटो स्टृडिओ हा स्वयंरोजगाराचा उत्कृष्ट व्यवसाय आहे.

२. विघ्नेश डिजीटल फोटो स्टृडिओ या स्वयंरोजगारासाठी सुरूवातीस मोठया प्रमाणत गुंतवणुक करावी लागते.

३. विघ्नेश डिजीटल फोटो स्टृडिओ मध्ये सुरूवातीस खर्चा वजा होईपर्यंत नफा हा कमी व नंतर दिर्घकाळात नफा जास्त प्रमाणात मिळतो.

४. फोटोग्राफी व्यवसायामध्ये सातत्याने नाविन्यपुर्ण बदल आहेत.

५. विघ्नेश डिजीटल फोटो स्टृडिओ या व्यवसायामध्ये रोजगाराची निर्मिती तसेच व्यवसायाचा विस्तार झाल्यामुळे रोजगाराचा विस्तार झाला आहे. व त्यातून स्थानिक पातळीवर रोजगार निर्मिती झाली आहे.

**संदर्भ सुची:**


१. https://www.amazon.in

२. https://www:pradhanmantri.yogana.in

३. https:www:economictimes.indiatimes.com

४. https://epaper.loksatta.com 01/02/2019

५. अर्थशास्त्रातील संशोधन पध्दतीशास्त्र भोसले काटे फडके, प्रकाशन, प्रथमावृत्ती डिसेंबर २०१२.

६. कलासंगम फोटो स्टृडिओ, माळीनगर ता. माळशिरस जि. सोलापूर. (प्रोप्रा. बाळकृष्ण नागनाथ काळे)

## वैष्णवी कॉम्युटर ॲन्ड टायपिंग सेंटर, अकलूज एक स्वयंरोजगार

**आकाश गजानन सावंत**
**एम.ए. २ अर्थशास्त्र**
**मो. नं. ९६६५३७०५९७**

**प्रस्तावना**

मानवी जिवनाच्या विविध क्षेत्रामध्ये माहितीस अनन्यसाधारण महत्त्व असते. निर्णय प्रक्रियेमध्ये माहिती टाळणे कधीही योग्य ठरत नाही. प्रत्येक क्षेत्रातील नियोजन, वैयक्तिक विकास, सार्वजनिक व्यवस्थापन, साधन संपत्तीचा पर्याप्त वापर या व इतर अनेक मानवी जिवणाच्या उपक्रमाला माहितीची जोड देणे आवश्यक असते. उपलब्ध माहिती स्पष्ट करण्यासाठी आलिकडील काळात तंत्रज्ञानाचा मोठया प्रमाणात वापर होत असलेला दिसून येतो. त्यामुळेच आधूनिक युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग आहे असे म्हटले जाते. आज माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग शेती, उघोग, व्यापार, शिक्षण, आरोग्य, पर्यटन, वाहतुक या व इतर अनेक क्षेत्रामध्ये होत असलेला दिसून येतो,

त्या अनुषंगाने प्रस्तुत शोध निबंधामध्ये वैष्णवी कॉम्युटर ॲन्ड टायपिंग सेंटर, अकलूज या संशोधनामध्ये माहिती तंत्रज्ञानाची काय भुमिका आहे याचा सविस्तर अभ्यास केला आहे. याचा स्वयंरोजगार निर्मितीसाठी मोठया प्रमाणात फायदा होतो.

**उद्देश :**

१. स्वत:च्या स्वयंरोजगारातून इतरांना परिपुर्ण व पुर्ण वेळ रोजगार उपलब्ध करून देणे.

२. व्यवसाय करत असताना येणाऱ्या समस्या व अडचणीचा परिपुर्ण अभ्यास करणे.

**विश्लेषण :**

प्रस्तुत संशोधन हे **मौजे अकलूज ता. माळशिरस जि. सोलापूर येथील वैष्णवी कॉम्युटर ॲन्ड टायपिंग सेंटर** या कॅफेपुरता मर्यादित असून त्यापासून संशोधनाची उद्दिष्टे, संशोधन परीकल्पना, संशोधन पध्दती, माहिती गोळा करणे, माहितीचे विश्लेषण, संशोधनाची मांडणी करणे संशोधन सादरीकरण या सर्व गोष्टीची माहिती असणे आवश्यक असते. त्यापासून उत्तम स्वयंरोजगार करता येतो.

**कॉम्युटर व्यवसाय चालू करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या पुरक वस्तू**

१. कॉम्युटर ०२ नग

२. कलर प्रिंटर्स ०१ नग

३. स्कॅनर ब्लॉक प्रिंटर्स ०१ नग

४. इंटरनेट कनेक्शन, वाय—फाय इत्यादी गोष्टींचा समावेश हा स्थिर खर्चामध्ये केला जातो.

५. एक गाळा —स्थावर मालमत्ता किंवा जाग स्वत:ची/भाडयाने

६. खुर्च्या, टेबल दोन—दोन नग

स्थिर खर्चाच्या मानाने बदलता खर्च हा ३० टक्के असतो. म्हणजेच बदलत्या खर्चाचे प्रमाण हे कमी आहे.

**कॉम्युटर ॲन्ड टायपिंग सेंटर, व्यवसायसाठी भांडवलाचे स्त्रोत/कर्ज योजना :**

मायक्रो युनिटस डेव्हलपमेंट अॅन्ड रिफायनान्स एजन्सी लिमिटेड (मुद्रा बॅक योजना) स्थापना ८ एप्रिल २०१५ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली.

**वैष्णवी कॉम्प्युटर अॅन्ड टायपिंग सेंटर : स्वयंरोजगाराचे आधुनिक माध्यम:**

कॉम्प्युटर अॅन्ड टायपिंग सेंटरमध्ये स्वयंरोजगारासाठी आधुनिक कॉम्प्युटर,प्रिंटर, स्कॅनर इ. आधुनिक उपकरणाची आवश्यकता असते. या व्यवसायासाठी कोणत्या प्रकारचा कॉम्प्युटर, प्रिंटर, स्कॅनर व इंटरनेट कनेक्शन वापरणार आहे याचा आढावा घेणे आवश्यक असते. संगणक फक्त १ ते ० हेच अंक समजू शकतो. संगणकाचे तीन प्रकार आहेत ते खालीलप्रमाणे :

१. अनालोग
२. डिजीटल
३. हायब्रिड

या व्यवसायामध्ये कमीत कमी ३ कामगारांची गरज असते. हे कामगार अनुभवी व सुशिक्षीत असणे गरजेचे असते. तसेच कॉम्प्युटर प्रिंटर व स्कॅनर यांचे पुर्ण ज्ञान व येणाऱ्या समस्या सोडविणे आवश्यक आहे.

**वैष्णवी कॉम्युटर अॅन्ड टायपिंग सेंटर, अकलूज ता. माळशिरस जि. सोलापूर या दुकानातील उत्पादन खर्च, नफा—तोटा पत्रक पुढीलप्रमाणे.**

| अ.क्र | तपशिल | खर्च | उत्पन्न | निव्वळ नफा |
|---|---|---|---|---|
| १ | ऑनलाईन ७/१२ उतारे | ०५ | २० | १५ |
| २ | पॅनकार्ड | १४७ | २०० | ५३ |
| ३ | आधारकार्ड प्रिंट | २० | ५० | ३० |
| ४ | शेततळे फार्म भरणे | ५० | १०० | ५० |
| ६ | गॅझेट | ५५६ | १२०० | ६४४ |
| ७ | वर्तवणुकीचा दाखला | २५० | ४०० | १५० |
| ८ | ऑनलाईन नोकरीचा फार्म भरणे | ४० | ११० | ७० |
| ९ | टायपिंग प्रति पेज | १५ | ४० | २५ |

सदर व्यवसाय हा स्वयंरोजगार असल्याने भाडवंल गुंतवणुक केल्यानंतर चालकाच्या सर्जनशिलतेवरून व कामाच्या स्वरूपावरून होणारा खर्च व होणारा नफा आपणास लक्षात येतो.

**समस्या :**

१. कॉम्प्युटर अॅन्ड टायपिंग सेंटर या व्यवसायासाठी वीजेची आवश्यकता असते. वीज पुरवठा खंडित झाल्यास कामे पुर्ण करता येत नाहीत.
२. या व्यवसायामध्ये टायपिंगसाठी हिंदी, मराठी, इंग्रजी भाषेचे टायपिंग कोर्स होणे आवश्यक असते.
३. सर्व्हर डाउन असल्यास ऑनलाईन कामास अडचणी निर्माण होतात.

४. काही ऑनलाईन दाखले (७/१२, ८अ, ६ड) काढण्यास वेळ लागल्यास ग्राहकांच्या असंतोषपणाला सामोरे जावे लागते.

**उपाययोजना**

**१.** कॉम्प्युटर ॲन्ड टायपिंग सेंटर या व्यवसायामध्ये विज पुरवठा खंडीत झाल्यास इनव्हर्टर बॅटरीजद्वारे कामकाज चालू ठेवता येते.

**२.** सर्व्हर डाउन झाल्यास एअरटेल, आयडिया कंपनीचे इंटरनेट वापरता येते.

**निष्कर्ष :**

१. कॉम्प्युटर ॲन्ड टायपिंग हा स्वयंरोजगाराचा आधुनिक मार्ग आहे

२. कॉम्प्युटर ॲन्ड टायपिंग या स्वयंरोजगारासाठी सुरवातीला स्थिर गुंतवणूक खर्च हा बदलत्या खर्चावरून मानाने जास्त आहे

३. या व्यवसायामध्ये ७५टक्के कामाचे स्वरूप हे ऑनलाईन आहे

४. या व्यवसायामध्ये सातत्याने नावीन्यपुर्ण ऑनलाईन बदल होत आहेत

**सारांश :**

प्रस्तुत संशोधन अहवालामध्ये **वैष्णवी कॉम्युटर ॲन्ड टायपिंग सेंटर, अकलूज** यांच्या स्वयंरोजगार या व्यवसायापासून मोठया प्रमाणात नफा मिळवता येतो हे आपणास दिसून येते.

**संदर्भ :**


१. अर्थशास्त्रातील संशोधन पध्दतीशास्त्र, भोसले–काटे, फडके प्रकाशन, प्रथमावृत्ती डिसेंबर, २०१२.

२. https://www.quora.com>whats a fall from computer.

३. https://www.amazon.in

# बेरोजगारीवर मात करण्यासाठी शेतीपुरक व्यवसाय दुध संकलन एक स्वयंरोजगार

**दत्तात्रय अर्जुन बनसोडे**
**एम.ए. २ अर्थशास्त्र**
**मो. नं. ९६२३६७९७०२**

**प्रस्तावना**

आपला देश कृषी प्रधान देश असून आपल्या देशातील बहुसंख्य लोक शेती व शेतीपुरक व्यवसायावर अवलंबून आहेत. शेती व्यवसायाच्या प्रगतीवर देशांची अर्थव्यवस्था अवलंबून असल्याने शेती व शेतीपुरक व्यवसायाची प्रगती म्हणजेच देशाची प्रगती ही भारतीय अर्थव्यवस्थेचे सुत्र आहे. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये शेती क्षेत्राला महत्त्व दिले जाते. व शेती व शेतीपुरक व्यवसायाचा पाया धरून आर्थिक धोरणे राबवली जातात.

अलीकडील काळामध्ये सुशिक्षीत बेरोजगार हा अर्थव्यवस्थेपुढे मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. तसेच नुसत्या शेतीवर उपजिवीका करण्यासाठी आर्थिक अडचण निर्माण होत असून त्यासाठी तसेच बेरोजगारीवर मात करण्यासाठी शेतीपुरक व्यवसाय म्हणून दुध संकलन या स्वयंरोजगार निर्माण करता होतोत्र दुग्ध व्यवसायातून कुटुंबावर येणाऱ्या आर्थिक अडचणीवर मात करता येते. तसेच बेरोजगारीव मात करता येते व या स्वयंरोजगारातून इतरांना रोजगार निर्माण करून देता येतो.

**उद्‌देश**

१. शेती पुरक व्यवसाय दुग्ध संकलनांचा अभ्यास करणे.

२. सगर दुग्ध संकलन या व्यवसायातून निर्माण होणाऱ्या रोजगार संधीचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत संशोधन हे **सागर दुध संकलन केंद्र** यावर अधारित असून संशोधन करत असताना त्यातील साधन सामुग्री, दुधाच्या मुळ किंमती, नफा—तोटा व उत्पादन खर्च इत्यादी पत्रकाचा अभ्यास करण्यास आलेला आहे.

**दुध संकलन केंद्र सुरू करण्यासाठी लागणारी साहित्य**

१. कुलींग मशिन

२. कॅन्ड ४० लीटर

३. थर्मामीटर

४. दुध गोळा करण्यासाठी वाहन

५. वजन काटा लिटरमध्ये

६. लीटरचे मापे

**विश्लेषन :**

प्रस्तुत दुध संकलन अहवाल हा सागर दुध संकलन केंद्र, आव्हे ता. पंढरपूर या गावापुरता मर्यादित आहे. हा संशोधन अहवाल स्वयंरोजगारावर आधारित आहे. त्याचे उत्पादन खर्च व नफा—तोटा पत्रक पुढीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र. १**

**नफा—तोटा वर्गीकरण**

| अ. क्र | दुध (लिटरमध्ये) | खरेदी किंमत | संकलन खर्च | विक्री किंमत | निव्वळ नफा |
|---|---|---|---|---|---|
| १ | ५० | ७५० | ५० | ८५० | ५० रू. |
| २ | १०० | १५०० | १०० | १७०० | १०० रू. |
| ३ | २०० | ३००० | २०० | ३४०० | २०० रू. |
| ४ | ५०० | ७५०० | ५०० | ८५०० | ५०० रू. |
| ५ | १००० | १५००० | १००० | १७००० | १००० रू. |
| ६ | १५०० | २२५०० | १५०० | २५५०० | १५०० रू. |

**संदर्भः क्षेत्रीय पाहणी**

सदर सागर दूध संकलन केंद्राचे नफा—तोटा पत्रकावरून दिसून येते की, ५० लिटर दूध खरेदी केले असता त्यांच्यावर दूध संकलन प्रक्रियेसाठी ५० रूपये खर्च होतो. तसेच ५० लिटर दूध विक्री करून मिळणारा नफा ५० रूपये एवढा मिळतो. जसजसे दूध जास्त खरेदी करून विक्री कराल तसतसे मिळणारा नफा हा वाढत जातो हे वरील तक्ताच्या आधारे आपणास कळून येते.

**रोजगार संधी :**

दैनंदिन सकाळ व संध्याकाळ दुध गोळा करण्यासाठी २ कामगार लागतात. तसेच दुधावरती संकलनांची प्रक्रिया करण्यासाठी २ कामगारांना रोजगार संधी उपलब्ध होते. दुग्ध संकलन व्यवसायात ४ गरजू कामगारांना काम करण्याची संधी उपलब्ध होते.

**समस्या :**

१. जास्त दिवस दुध साठवण करू शकत नाही.

२. अचानक दर कमी झाले असता तोटा सहन कराव्या लागतो.

**उपाययोजना :**

१. दररोजच्या दररोज दुध खरेदी केल्यानंतर दुध संकलन करून विक्री केलेले फायदेशीर ठरते.

**निष्कर्ष :**

१. दूध संकलन वाढल्यास संयोजकाच्या नफ्यात वाढ होते.

२. सर्व ग्राहकांना दुधाचा दर एकच दिला जातो.

३. दूधांचे दर वाढवुन दिले असता संकलनात वाढ झालेली दिसून येते.

४. दैनंदिन जीवनात रोजच्या आहारामध्ये दुधाचा वापर केला जातो.

५. दुध जास्त दिवस ठेवल्यानंतर त्यांची दुर्गंधी येते.

६. दुधात एखादा पदार्थ पडला तर ते दुध खराब होते.

**सारांश :**

प्रस्तुत संशोधन अहवालामध्ये सागर दूध संकलन केंद्र यांच्या स्वयंरोजगातील व्यवसायामध्ये शेतकरी ग्राहक व संयोजक यामधील खरेदी, दुधाचे दर, त्यावर होणारा खर्च त्यातून होणारा नफा, तोटा यांचा अभ्यास केला आहे. तसेच स्वयंरोजगारातुन बेराजगारीवर केलेली आहे.

**संदर्भ :**

१. सागर दुध संकलन केंद्र, आवे ता. पंढरपूर यांचे चेअरमन बनसोडे दत्तात्रय अर्जुन यांच्या स्वयंरोजगार व्यवसायावर आधारीत आहे.

२. हा संशोधन पेपर अहवाल तयार करत असताना शिवामृत हे पुस्तक वाचले.

# कुक्कट पालन व्यवसाय —स्वयंरोजगाराचे माध्यम

**हर्षला सौदागर रेडेकर**
**एम. ए. २ अर्थशास्त्र**

**प्रस्तावना :**

शेतकऱ्यांचे घर म्हटले की, पशुसंगोपन आलेच मुख्यत: गाई, म्हशी, शेळया आणि कोंबडी पालन हे घरो — घरो सांभाळून त्यातून शेतीला पुरक अर्थार्जन देतात. यापैकी कोंबडी पालन हा अतिशय सोपा कमी खर्चात कमी जागेत आणि कमी कष्टात करण्यासाठी व्यवसाय त्यातल्या त्यात, ब्रॉयलर पेक्षा गावरान कोंबडी पालन किंवा परिसरातील कुक्कुट पालनामध्ये पशुपालन केले जाते. मुळात हा व्यवसाय मुक्त गोठयामध्ये गायी—म्हशी सोबत केला जाऊ शकतो.त्यासाठी वेगळे काही करायची गरज नाही. देशी किंवा गावरान क्रॉस जाती हया अतिशय काटक आणि उत्तम रोजप्रतिकारकक्षम असतात.

कुक्कुटपालनामध्ये कोंबडया पाळताना आपण कशा पाळतो यालाही महत्त्व आहे. विशेष म्हणजे कुक्कुटपालनामध्ये कोंबडयाची घरे कशी बांधली जातात, यावर त्यांचे उत्पादनही अवलंबून आहे. कुक्कुटपालनातून छोटा—मोठा रोजगार सांभाळणारी अनेक कुटुंबे आहेत. ग्रामीण भागात घराघरात केले जाणारे कुक्कुटपालनहे चालता—बोलता पैसे देणारे आहे. कोंबडीपालन हा एक प्राचीन व्यवसाय आहे. कोंबडीपालन हे शेतीस पुरक म्हणून उपजीविकेचे साधन आहे. यामध्ये मासांसोबत अंडयांचे उत्पादन होते. हल्ली शहरी लोकसंख्येला चांगलया दर्जाची अंडी आणि चिकन वाजवी दरात उपलब्ध होत नाही. त्यामुळे चांगली किंमत देऊन चिकन खरेदी करायला लोक तयार असतात.

**उद्‌देश :**

१. कोंबडी पालनातून निर्माण होणाऱ्या रोजगारसंधीचा अभ्यास करणे.

२. कोंबडी पालन व्यवसाय करताना येणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :**

१. कोंबडी पालन व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्याशी प्रत्यक्ष भेटून माहिती गोळा केली.

२. तसेच इंटरनेटद्वारे, ॲगोवन (सकाळ), शेतीसाठी उपयुक्त असणाऱ्या पुस्तकातून माहिती घेतली.

**विश्लेषण :**

कोंबडी पालन व्यवसायाबाबत राजनंदीनी पोट्री हॉऊस (सराफवाडी, ता. इंदापूर) ला भेट दिली पाण्याचा शाश्वत स्त्रोत नसल्यामुळे शेतीला जोडधंदा म्हणून कोंबडी पालनाचा व्यवसाय त्यांनी निवडला. व्यवसाय सुरु करताना त्यांनी ब्रॉयलर कोंबडी निवडली. ब्रॉयलर कोंबडी ही मासांसाठी विक्री केली जाते. साधारण पिल्ले आणल्यानंतर ते ४५ दिवसात ते विकले जाते. त्यामुळे त्यांना कमी कालावधीत जास्त पैसे मिळवण्याचा हेतू होता.

एक छोटे कमी खर्चाचे पत्र्याचे शेड उभारुन ३०० पिलांपासून कोंबडी पालनाला सुरुवात केली आता तेच ३००० नग त्यांच्याकडे आहेत.

**शेडची उभारणी :**

कोंबडी पालनासाठी शेड महत्त्वाचे असते. शेडची उंची लांबी—रुंदी ठरावीक मर्यादेपर्यंतच असते. तसेच हवा खेळती राहील अशा ठिकाणी शेड असावी.

१. मध्यभागी १० ते १२ फूट उंच आणि दोन्ही बाजूस ८ ते १० फुट उंची आहे.

२. शेडला २ ते ३ फुट उंच भिंत आहे.

३. जाळीच्या साहाय्याने शेड बंदीस्त आहे.

४. जमीनीवर कोबा आहे.

**पिलांची काळजी :**

१. कोंबडी पालनासाठी ब्रॉयलर जातीची पिले आहेत.

२. नगरच्या एमआयडीसीतून १८ रु एक पिल्ले विकत घेतात. एका बॅचला २ हजार पिल्ले खरेदी करतात.

३. सुरुवातीचे १५ दिवस पिल्लांकडे अधिक लक्ष दिले जाते. त्याचबरोबर लसीकरणही खूप महत्त्वाचे असते.

४. पहिले १५ दिवस त्यांना उष्णता दिली जाते. की विजेद्वारे पुरविली जाते.

५. त्यांच्या लसीकरणाकडे जास्त लक्ष दिले जाते. पहिल्या सात दिवसात लासोटा नावाची लस दिली जाते. १४ दिवसानंतर गंभोरा, २० दिवसानंतर लासोटा दिली जाते. वेळेवर लसीकरण केल्यास भर कमी होते. तसेच वजनही वाढते. यासाठी विविध प्रकारचे टॉनिकही उपलब्ध आहेत.

६. पिल्लं लहान असताना त्यांना पिठासारखे खाद्य दिले जाते. सोयाबीन, मका व आवश्यक केमिकलयुक्त खाद्य विकत घेतले जाते.

७. ५० किलोची बॅग, १ हजार २०० रु. मिळते. तेच खाद्य कोंबडयांना दिले जाते. त्यातून कोंबडी वाढीसाठी फायदा होतो.

**पाणी व्यवस्थापन :**

पण्याची भांडी रोज स्वच्छ व ताज्या पाण्याने चुकली
जातात. त्यावर झाकण असावे. पाण्याची भांडी उंच विटांवर ठेवावीत व विटांस चुना लावावा. त्यामुळे पाणी सांडत नाही.

**लसीकरण :**

१. दिवस—मॅटेक्स—मॅटेक्स पायाच्या स्नायुमध्ये किंवा मानेत

२. ५—७ दिवस — राणीखेत —लासोटा—नाकात एक थेंब

३. ४ आठवडे —श्वसनलीकेच्या डोळयात दोन थेंब

४. ५ आठवडे — लासोटा — पिण्याच्या पाण्यातून

५. ६ आठवडे — देवी — पंखाखाली कानळीतून टोचून.

**पक्ष्यांचे नियोजन :**

१. एका बॅचमध्ये ३००० हजार पक्ष्यांचे व्यवस्थापन केले जाते.

२. त्यांचे खाद्य व्यवस्थापन, लसीकरण शिफारशीनुसार केले जाते.

३. ४ आठवडयानंतर पक्ष्यांचे वनज १ किलोपेक्षाजास्त होते. पक्षी विकण्याच्या वेळेस ते २ किलोपर्यंत असते.

**सरकारची मदत :**

१. कोंबडी पालन करताना खर्च झालेल्या रक्कमेच्या निमपट रक्कम अनुदान म्हणून मिळते.

२. भांडवल जमा करायला बॅकेकडून कर्जही मिळते.

**जनतेची बाजू :**

१. कोंबडी पालन व्यवसाय ३ व्यक्तींना रोजगार दिला जातो.

२. ज्या कंपनीकडून पिले खरेदी केली जातात. तिच कंपनी कोंबडी विकत घेतात.

३. ९ कोंबडीला किंमत ही ६०—७० रु. किलो पर्यंत असतो.

४. कोंबडीपासून खतही मिळते. त्याला मागणीही चांगली आहे. ३०—४० बॅग एक हजार कोंबडयांपासून मिळतात. त्यातून दहा हजार रुपये मिळतात.

५. वार्षिक उत्पन्न ४ लाख रुपये सहज मिळतात.

**समस्या :**

१. भांडवलाची टंचाई जाणवते.

२. उन्हाळयात जास्त पक्षी मृत पावतात.

३. योग्य मार्गदर्शनाचा अभाव असतो.

४. लसीकरण नाही केले तर रोगांचा प्रभाव दिसून येतो.

**उपाययोजना :**

१. उन्हाळयात शक्यतो पक्षी मृत पावण्याची जास्त शक्यता असते त्यामुळे उन्हाळयात लॉट न घेणे हीताचे ठरते.

२. पक्ष्यांना वेळोवेळी लसीकरण करणे त्यामुळे पक्षी कमी दगावतील.

**निष्कर्ष :**

१. एका पोल्ट्री हॉऊस मधुन चांगले उत्पन्न मिळून ३ ते ४ लोकांना रोजगार उपलब्ध होतो.

२. पोल्ट्री हॉऊसमुळे कुटुंबातील प्रत्येकाला रोजगार उपलब्ध होईल.

संदर्भ :

## स्वयंरोजगाराचे माध्यम : शेळीपालन व्यवसाय

**कामिनी कल्याण कडाळे**
**एम. ए. २ अर्थशास्त्र**

**प्रस्तावना :**

ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा हा पशुपालन व्यवसाय आहे. शेती करीत असताना शेतकरी शेळीपालन जोडधंदा म्हणून करीत असतो. शेळ्यांचे गायी म्हशींचे संगोपन करण्याकडे शेतकरी जास्त भर देतात.सर्वात कमी गुंतवणुकीमध्ये शक्य असलेली शेळीपालन हा व्यवसाय सहज स्वीकारला जातो.

भारत देशामध्ये प्रचंड प्रमाणात बेकारीची समस्या ही निर्माण झाली आहे. तरुणांना विशेष म्हणजे ग्रामीण भागातील तरुणांना रोजगारांच्या संधी मिळत नाहीत. अशा वेळी तरुण हे स्वयंरोजगाराकडे वळतात. स्वयंरोजगार म्हणजे स्वत: स्थापन केलेला एखादा लहान लघु उद्योग होय. स्वयंरोजगार व्यवसाय आहे.

शेळीपालन या व्यवसायामुळे किती लोकांना रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या. तसेच हा व्यवसाय करताना कोणत्या समस्या निर्माण होतात. की नाही हे अभ्यासण्यासाठी शेळीपालन या विषयाची निवड करण्यात आली आहे.

**उद्देश :**

१. शेळीपालन व्यवसायाविषयी माहिती जाणून होणे.

२. शेळीपालन व्यवसायातून रोजगार निर्मितीच्या संधीचा अभ्यास करणे.

**संशोधनपध्दती :**

शेळीपालन व्यवसायाची माहिती मिळवण्यासाठी प्राथमिक स्त्रोत मुलाखत निरीक्षणे, अनुसूची तर दुय्यम स्त्रोत, प्रकाशित साहित्य पुस्तके इत्यादी वापरण्यास आली. अजंना शेळीपालन व्यवसाय पिंपरी खुर्द, इंदापूर जि. पुणे. मुलाखत

**विवेचन:**

प्रस्तुत संशोधनामध्ये अंजना शेळीपालन व्यवसाय पिंपरी खुर्द या गावातील शेळीपालन या व्यवसायाचा अभ्यास करण्यात आला आहे. शेळीपालन व्यवसायामुळे रोजगार कशा प्रकारे निर्माण होतात याची माहिती घेण्यात होण्यास आली आहे.

**तक्ता क्र. १**

**शेळ्यांच्या प्रकारानुसार वर्गीकरण**

| अ. क्र. | शेळ्यांचे प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १ | सिरोही शेळी | १७ |
| २ | स्थानिक शेळी | ०८ |
| ३ | संगमनेरी शेळी | १५ |
| ४ | बोकड | ३० |
| ५ | लहान करडे | २० |
| | | **एकुण संख्या ३०** |

**संदर्भ : क्षेत्रीय पाहणी अंजना शेळीपालन व्यवयाय पिंपरी खुर्द ता. इंदापूर जि. पुणे**

वरील तक्ता विश्लेषणावरुन असे दिसून येते की हा व्यवसाय करत असताना त्यांनी ३ प्रकाराच्या जातीच्या शेळयांचा समावेश करण्यात आला त्यांना वर्षातून ३० बोकडे इतके उत्पादन प्राप्त होते. तर लहान करडे ही २० इतके मिळतात.

शेळीपालन व्यवसाय २०१५ पासून सुरु करण्यात आला आहे. तर आज या व्यवसायात सुमारे ८० एवढी शेळयांची संख्या आहे. यामध्ये ३ ते ४ पैदाशीचे बोकड ठेवण्यात येतात.

**तक्ता क्र. २**

**रोजगार निर्मितीनुसार वर्गीकरण**

| अ. क्र. | कामे | संख्या | वेतन (प्रति दिन) |
|---|---|---|---|
| १ | स्वच्छता करणे | १ | २०० |
| २ | चारा व्यवस्थापन | १ | २०० |
| ३ | बाजारपेठेत विक्री करणे | २ | २०० |
| | | **एकुण ४** | |

**संदर्भ : अंजना शेळीपालन व्यवसाय पिंपरी खुर्द ता. इंदापूर. जि. पुणे**

वरील तक्त्यामध्ये शेळीपालन या व्यवसायातून ४ लोकांना रोजगाराची संधी निर्माण झाली.

**व्यवस्थापन :**

शेळयांना राहण्यासाठी गोठयांचे नियोजन करण्यात येते. हा गोठा उंचवल्यावर, मुरसाड जमिनीवर आहे. या गोठयांचा आकार ३० चौ. फुट व २० चौ. फुट आहे. शेळया, बोकडे, लहान पिल्लु यानुसार कप्पे करण्यात आले आहेत.

**आहार :**

| अ. क्र. | घटक | करडयाचा आहार | स्तनपान देणाऱ्या शेळीचा आहार | गाभण शेळीचा आहार |
|---|---|---|---|---|
| १ | ज्वारी | ३७ | ५२ | ३५ |
| २ | डाळी | १५ | — | — |
| ३ | तेलवडया | २५ | ८ | २० |
| ४ | गवताचा भुसा | २० | ३७ | ४२ |
| ५ | खनिज मिश्रण | २.५ | २ | २ |
| ६ | सामान्य मीठ | ०.५ | ७ | ७ |

**संदर्भ : अंजना शेळीपालन पिंपरी खुर्द ता. इंदापूर जि. पुणे**

**शेळीपासून मिळणाऱ्या दुधाचे प्रमाण :**

शेळीपासून सुमारे एका दिवसाला १५ लिटर इतके दुध मिळते हे स्थानिक दुधकेंद्रात विकण्यात येते.

**शेळयांचे आजार :**

शेळयांच्या अंगावर गोचीड, पिसवा, उवा, लिखा विषाणुमुळे होणारे रोग जिवाणुमुळे होणारे रोग इ. असतात.

**प्रतिबंधक उपाय :**

१. जंतनाशके, कित्कनाशके यांचा वापर

२. लसीकरण (वर्षातून दोन वेळ देणे)

३. शेळयांना अधूनमधून गोचीडनाशक पाण्याने आंघोळ घालावी.

**शेळयांची विक्री वाहतूक व्यवस्था :**

शेळयांना स्थानिक बाजारपेठेतून कमी भाव दिला जातो. परंतु तालुका किंवा जिल्हेचा ठिकाणी विक्रीसाठी नेण्यास वाहतूक खर्च हा पण जास्त असतो. परंतु भाव जास्त असल्यामुळे मोठया बाजारपेठेमध्ये विकण्यास नेले जाते.

**शेळी विमा योजना :**

एखादी शेळी आजारी किंवा मृत पावल्यास तात्काळ नजिकच्या पशुचिकित्यालयास संपर्क साधून विमा योजनेचा लाभ घेण्यात येतो.

**सरकारी योजना :**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेळी मेंढी विकास महामंडळ हे जिल्हाधिकार्याच्या अधिपत्याखाली असलेले महामंडळ असून त्यातर्फे शेळी पालनास ५०% ते ७५% सबसिडी दिली जाते. त्यामध्ये शेळयांची किंमत जागेची किंमत लागणारे सामान इ. पुरविले जाते तसेच काही राष्ट्रीयकृत बॅका आणि आय.डी.बी.आय हया सरकारी बॅका पण कर्ज पुरवठा करते त्यात २५ लाखांपासून ५० लाखांपर्यंत कर्ज दिले जाते. यावर ३३% सबसिडी दिली जाते. तरी १२% व्याजदर असतो.

**अंजना शेळीपालन व्यवसाय पिंपरी खुर्द जमाखर्च तक्ता**

| | |
|---|---|
| व्यवस्थापक : | बाळू नरुटे |
| एकुण उत्पन्न : | |
| एकुण शेळया : | ४० |
| १४ महिन्यात : | ६४ करडं विक्री |
| एका करडांच वनज : | २२ किलो |
| प्रती किलो : | ३०० रुपये दर |
| करडांच उत्पन्न : | ४,६९,००० |
| दूध आणि लेंडी : | ६२,००० |
| एकुण उत्पन्न : | ५,३१,००० |
| उत्पादन खर्च : | १,२०,००० |
| निव्वळ उत्पन्न : | ४,११,००० |

**समस्या :**

१. शेळीच्या बाजारपेठेमध्ये सतत बाजारभावात चढउतार होत असतो.

२. चारा, पाणी, यांची कमतरता ही उन्हाळयात तीव्र जाणवते.

३. स्थानिक बाजारात शेळयांना कमी भाव दिला जातो.

४. शेळयांना बाहय किटक व परजिवी घटकापासून जास्त आजार होतात.

**निष्कर्ष :**

१. शेळीपालन हा उत्तम स्वयंरोजगार व्यवसाय आहे.

२. एका शेळीपालन व्यवसायातून चार लोकांना रोजगाराची संधी निर्माण झाली आहे.

३. कमी भांडवलातून एक चांगला व्यवसाय निर्माण होतो.

४. शेळीपालन व्यवसायात मोठया प्रमाणात वाढ झाली आहे.

**संदर्भ सुची :**

१. Google

२. वर्तमान पत्रे, पुस्तके

३. शेळीपालन व्यवसाय

४. अंजना शेळीपालन व्यवसाय पिंपरी खुर्द ता. इंदापूर जि. पुणे

# चैतन्य चमडी व्यवसाय : स्वयंरोजगार निर्मितीचे साधन

**काजल विनायक शिंदे**
**एम. ए. २ अर्थशास्त्र**

**प्रास्ताविक :**

जगभरातील ९०% चमडी ही गायी शेळी मेंढीपासून मिळते. जगभरात चमडयाचा सर्वाधीक व्यवसाय हा ऑस्ट्रेलिया या देशामध्ये चालतो. भारतातील उत्तर प्रदेशातील कानपूर हे ठिकाण चमडयाच्या व्यवसायासाठी प्रसिध्द आहे. या मेंढीपासून सर्वाधीक लोकर मिळते. चमडयापासून अनेक प्रकारच्या वस्तू बनवल्या जातात. या व्यवसायामध्ये भरपूर प्रमाणामध्ये मजुरांची आवश्यकता असते. चमडयाच्या व्यवसायाचा भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नामध्ये महत्वाचा वाटा आहे. चमडयापासून तयार केल्या गेलेल्या वस्तूची निर्यात इतर देशामध्ये केली जाते. चमडयाचा वापर हा चप्पल, बूट, कोट, बॅगा, पर्स इ, वस्तू बनवण्यासाठी केला जातो.

**उद्दीष्टये :**

१. चैतन्य चमडी उदयोगातील रोजगार संधीचा अभ्यास करणे.

२. चैतन्य चमडी व्यवसायातील समस्या व उपायांचा अभ्यास करणे.

३. चैतन्य चमडी व्यवसायाचे महत्त्व अभ्यासणे.

**संशोधन पध्दती :**

चैतन्य चमडी व्यवसाय स्वयंरोजगाराचे माध्यम या अभ्यासपध्दतीसाठी मुलाखत, निरीक्षणे या प्राथमिक पध्दतीचा अवलंब केला आहे.

**चैतन्य चमडी व्यवसाय : स्वयंरोजगाराचे साधन :**

चैतन्य चमडी व्यवसायाचा देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये मोलाचा वाटा आहे. हा व्यवसाय अनेक बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन देणारा आहे. चैतन्य चमडी व्यवसायामध्ये १५ मजूर काम करतात. यामध्ये अत्यावश्यक पाण्याची गरज असते. या व्यवसायास जास्त जागेची गरज असते. यामध्ये चमडयाची आयात केली जाते. चमडी आयात केल्यानंतर त्यावर विविध प्रक्रिया केल्या जातात. चमडीवर रसायनांचा वापर केला जातो. रासायनिक प्रक्रिया केल्या जातात. चैतन्य चमडी व्यवसायासाठी लागणारी चमडी ही शेळी, मेंढी, गाईची वापरली जाते. या चमडीवर प्रक्रिया करताना वापरली जाणारी रसायने ही मानवी शरीरास आरोग्यास घातक आहेत. यातून मोठया प्रमाणात मोबदला मिळतो.

चमडीपासून चांगला माल तयार करताना चमडीवर विविध प्रक्रिया केल्या जातात. आणि ती स्वच्छ केली जाते. त्यानंतर त्यापासून लोकर प्राप्त होते. त्याचा उपयोग स्वेटर बनवण्यासाठी केला जातो.

**प्रक्रिया :**

बाजारातून चमडी आणून ती स्वच्छ करणे त्यावर विविध प्रकारचे रसायने उदा. ॲसिड, गंधक, एक्झीलीक पावडर, अमोनिया, सोडीयम इत्यादींचा वापर करुन ती चमडी वस्तू बनवण्यासाठी योग्य बनवणे. चैतन्य चमडी व्यवसाय हा पारंपारीक व्यवसाय आहे. चमडी वस्तू बनवण्यायोग्य बनवण्यासाठी कडू तेल, तरवाडाची साल, मीठ इ. चा वापर केला जातो. यावर ॲसीडचाही वापर केला जातो.

**औषधे :**

गंधक, सोडीअम, ॲसीड एक्झीीक पावडर, अमोनिया इ.

**मजूर :**

चैतन्य चमडी व्यवसायामध्ये १५ मजूरांची आवश्यकता असते. यामध्ये विविध प्रकारच्या प्रक्रिया केल्या जातात. त्यामुळे १५ मजुरांची आवश्यकता असते. मजूरांना दीवसाला ३०० रुपये मजुरी पडते. ही मजूरी त्यांना आठवडयाला दिली जाते.

**खर्च :**

चैतन्य चमडी व्यवसायासाठी लागणारी चमडी साधारणत: एक खंडी चमडीसाठी ३०,००० खर्च होतो. १५ मजुरांची ४५०० मजुरी चमडीवर प्रक्रिया करण्यासाठी अनेक रासायनीक घटकांचा वापर करावा लागतो त्यासाठी ५०,००० खर्च येतो. अशा प्रकारे ती चमडी पूर्णपणे वस्तू बनवण्यायोग्य होईपर्यंत आणि आयाती पासून ते विक्री करेपर्यंत ९०,००० एवढा खर्च येतो.

**उत्पन्न :**

चैतन्य चमडी व्यवसायाचा खर्च पाहिला असता खर्च हा ९०,००० होतो. चमडीची विक्री केली असता १,५०,००० एवढे उत्पन्न मिळते. एकूण उत्पन्नामधून एकुण खर्च वजा केला असता ६०,००० रुपये नफा मिळतो.

**चमडीच्या टाकाऊ घटकापासून मिळणारे उत्पन्न :**

चैतन्य चमडी व्यवसायामध्ये तीन प्रकारे उत्पन्न मिळते. यामध्ये सर्वात मोठा उत्पन्नाचा भाग हा चमडी आहे. आणि त्यानंतर चमडीपासून जी लोकर मिळते. आणि चमडीचे जे तुकडे

पडतात हे चमडीचे टाकाऊ घटक आहेत. तर या घटकापासूनही उत्पन्न मिळते. लोकरीपासून स्वेटर बनवले जातात.चमडीची कटींग केली जाते म्हणजे चमडी व्यवस्थित कट केली जाते. व त्यापासून जे तुकडे पडतात त्यांची विक्री केली जाते. तेव्हा अशा प्रकारे यामध्ये टाकाऊ वस्तूपासूनही उत्पन्न मिळते.

**साहित्य व अवजारे:**

यामध्ये विविध अवजारांचा वापर केला जातो. उदा. कुंधा, कोयता अशा प्रकारे विविध अवजारे वापरुन चमडी टिकाऊ बनवली जाते.

**दोष :**

**१. आरोग्य :**

या व्यवसायाचा मानवी आरोग्यावर घातक परिणाम होतो. हा व्यवसाय आरोग्यास घातक आहे. यामध्ये वापरले जाणारे रासायनिक द्रव्ये रसायने ही मानवी शरीरास घातक आहेत.

**२. जमिन :**

चैतन्य चमडी व्यवसायामध्ये रसायनांचा चमडीवर वापर केल्यामुळे याचा परिणाम हा जमिनीवर होतो. चमडीवर मिठाचेही प्रमाण सर्वाधीक असते. त्यामुळे जमिन ही खारट होते. व नापिक बनते.

**३. पाणी :**

चमडीवर रासायनिक प्रक्रिया केल्या जातात विविध प्रकारच्या रासायनिक घटकांचा वापर केला जातो व चमडीला मोठया प्रमाणात मीठ लावल्यामुळे चमडी धुतल्यानंतर ते मीठाचे पाणी जमिनीमध्ये मुरते व जमिनीतील भूगर्भातील गोडे पाणी राहत नाही या व्यवसायाजवळील जमिनीवरील विहिरी, बोअरवेल्सना खारे पाणी लागते.

**उपयोग :**

चैतन्य चमडी व्यवसायातील चमडीचा उपयोग हा बुट, चप्पल, पर्स, कोट. इ. बनवण्यासाठी केला जातो.

**महत्त्व :**

चैतन्य चमडी व्यवसाय हा पारंपारीक व्यवसाय आहे. यामध्ये १५ मजुरांना रोजगार मिळतो. स्वयंरोजगारास चालना लघु उदयोग हे नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे इतरांना प्रेरणा मिळते.

**निष्कर्ष :**

**१. रोजगाराची निर्मिती :**

चैतन्य चमडी व्यवसायातून १५ मजूरांना काम मिळते. तसेच २ जनांनी हा व्यवसाय सुरु केला तर ३० मजुरांना काम मिळते. जर ३ जनांनी हा व्यवसाय सुरु केला तर ४५ मजुरांना काम मिळते.

**२. उत्पन्नात वाढ :**

चमडी व्यवसायामध्ये टाकाऊ वस्तूंपासूनही उत्पन्न मिळते.

**३. देशाच्या आर्थिक विकासास सहायक :**

चमडी व्यवसाय केल्याने यामध्ये भरपूर प्रमाणात नफा प्राप्त होतो. त्यामुळे देशाचे राष्ट्रीय उत्पन्नामध्ये वाढ होते.

**४. शेतीवरील निर्भरता कमी :**

दुयम स्त्रोत चमडी व्यवसायामध्ये अनेक लोक गुंतल्याने शेतीवरील निर्भरता कमी होते.

**५. परंपरागत व्यवसाय :**

चमडी व्यवसाय हा परंपरागत व्यवसाय आहे. यामध्ये शिक्षणाची आवश्यकता लागत नाही. निरक्षर लोकही हा व्यवसाय करु शकतात.

**संदर्भ :**

1. https: // hi.m.wikipedia.org

2. https://exmmitra.in

3. https://navbharttimes.indiatimes.com

# बिजवडी खेडेगावातील हॉटेल व्यवसायीकांचा अभ्यास

**मोहन नवनाथ चव्हाण**
**एम.ए. २ अर्थशास्त्र**
**मो. नं. ९३७०६६१२७७**

---

**प्रस्तावना : (Introduction)**

हॉटेल म्हणजे, निवास व भोजनाच्या सोबतच्या इतर सोयी सुविधा उपलब्ध असलेले ठिकाण होय. इ. स. १३१२ मध्ये पॅरिश येथे हॉटेल या वस्तूची निर्मिती करण्यात आली. त्यानंतर हॉलंड, जर्मनी, फ्रान्स व इतर युरोपीय देशात हॉटेल उभारण्यात आले. इ. स. १८२० मध्ये पहिले प्रवासी हॉटेल स्विझर्लंड मध्ये निर्माण करण्यात आले. वाहतूकीच्या साधनात जसा बदल झाला. तशाच प्रकारचा बदल निवास्थानात सुविधा बदल होत गेला.

भारतातील हॉटेल आधुनिक पध्दतीचे आहेत. मुंबई या ठिकाणी १८६५ मध्ये मुंबईतल्या प्रसिध्द वॉटसन हॉटेलमध्ये तिथल्या दरबारात जमशेटजींना जाण्यास मज्जाव केला. ते हॉटेल फक्त इंग्रजासाठीच होते. हा अपमान राष्ट्रांना सहन झाला नाही. त्याच वेळी त्यांनी भारतीयांसाठी आंतरराष्ट्रीय तोडीचे हॉटेल बनवण्याचा निश्चय केला. त्यातूनच ताजची निर्मिती झाली.

**संशोधनाची उद्दिष्टये: (Objective)**

खेडीगावातील हॉटेल व्यवसायीकांचा अभ्यास करत असताना काही उद्दिष्टये ठेवण्यात आली आहेत. ती संशोधन अभ्यासाची उद्दिष्टये पुढीलप्रमाणे

१. बिजवडी येथील हॉटेल व्यवसायीकांचा अभ्यास करणे.

२. हॉटेल बाबत व्यवसायीकांच्या समस्या व उपायांचा अभ्यास करणे.

**परिकल्पना : (Hypothesis)**

**प्रस्तुत संशोधनासाठी पुढील परिकल्पना मांडल्या आहेत.**

१. हॉटेल व्यवसायीकांची आर्थिक व सामाजिक परिस्थिती सुधारली आहे.

२. हॉटेल व्यवसायामुळे बिजवडी गावात रोजगाराची निर्मिती झाली आहे.

**मर्यादा :**

प्रस्तुत संशोधन लेखातील निष्कर्ष केवळ बिजवडी गावापुरते मर्यादित आहेत.

**बिजवडी गाव : एक दृष्टीकोन**

बिजवडी गाव हे पुणे जिल्हयातील इंदापूर तालुक्यातील पश्चिमकडे पुणे – सोलापूर राष्ट्रीय महामार्गालगत बसलेले आहे. बिजवडी गावाला सामाजिक, आर्थिक व राजकिय दृष्टया

महत्वाचे स्थान आहे. कारण बिजवडी गावात कर्मयोगी शंकरराव पाटील साखर कारखाना बसलेला आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध झालेला आहे. बिजवडी गावाची ग्रामपंचायत ही ग्रुप ग्रामपंचायत म्हणून ओळखली जाते. कारण अन्य चार गावे या ग्रामपंचायत मध्ये समावेश आहे. बिजवडी गावाची लोकसंख्या ही ४३२८ एवढी आहे.

**संशोधन कार्यपध्दती : (Research Methotology)**

संशोधन कार्यपध्दती स्पष्ट करताना संशोधनासाठी निवडलेली पध्दती आधार सामुग्री संकलन, नमुना निवड व माहिती संकलनास मिळालेला प्रतिसाद वगैरे गोष्टीही स्पष्ट केल्या आहेत. ऐतिहासिक पध्दती प्रायोगिक पध्दती अशा ज्या संशोधनासाठी विविध आहेत. त्यापैकी सर्वेक्षण पध्दतीची निवड केलेली आहे.

**हॉटेल व्यवसायीकांचे उत्पन्न**

**तक्ता क्रमांक उत्पन्न – खर्च वर्गीकरण**

| अ. क्र. | व्यवसायाचे प्रकारे | दिवसाचा खर्च | दिवसाचे उत्पन्न | नफा |
|---|---|---|---|---|
| १ | हातगाडा | १७०० | ३००० | १३०० |
| २ | हॉटेल | ४५०० | ७००० | २५०० |
| ३ | ढाबा | ७५०० | १२००० | ४८०० |

**संदर्भ : क्षेत्रीय पाहणी**

वरील तक्त्यावरून असे स्पष्ट होते की, हातगाडा व्यवसायिकांना दिवसाचे उत्पन्न ३००० आहे. तसेच हॉटेल व्यवसायीकांचे दिवसाचे उत्पन्न ७००० त्याच प्रमाणे ढाबा व्यवसायीकांचे दिवसाचे उत्पन्न १२००० आहे.

वरील कोष्टकावरून असे स्पष्ट होते की हॉटेल व्यवसायीकांना चांगले उत्पन्न मिळते. उत्पन्नामुळे आर्थिक व सामाजिक परिस्थिती सुधारण्यास मदत होते.

**बॅंक कर्ज योजनेचा लाभ घेण्यासाठीची पात्रता /निष्कर्ष**

१. हॉटेल व्यवसायांच्या मालकीची जागा असावी.

२. सात – बारा, आठ अ दाखला आवश्यक

३. जमीन तांत्रिक दृष्टया पात्र असावी.

**हॉटेलची वैशिष्टये :**

१. हॉटेलमध्ये स्वच्छ व ताजे जेवण मिळते.

२. हॉटेल स्वच्छ व स्टाप मेंबर सुशिक्षित वर्ग आहे.

**हॉटेलचे महत्व :**

हॉटेल व्यवसाय हा पर्यटन स्थळाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा व्यवसाय आहे. या व्यवसायामुळे मोठया प्रमाणात रोजगार निर्मित झाली आहे. व्यवसायीकांच्या उत्पन्नात वाढ होते. त्याची कार्यशक्ती वाढते, हॉटेल व्यवसायीकांचा राहणीमानांचा दर्जा उंचावतो. त्याच प्रमाणे अर्थव्यवस्थेला गती मिळते.

**दोष :**

**१. जागेचा अपव्यय :**

हॉटेल बांधल्यानंतर त्याच्या समोरची जागा गाडी पार्किंग मध्ये जास्त पडून राहते.

**२. खर्चिक पध्दती :**

हॉटेल बांधण्यासाठी जास्त प्रमाणात खर्च येत असल्याने गरीब लोकांना हॉटेल बांधणे अशक्य असते.

**३. अन्न पदार्थ खराब होणे :**

हॉटेल मधील अन्न पदार्थ बनवलेले जास्त कालावधीत राहत नाही. त्याच्यामुळे नुकसान होण्याची दाट शक्यता असते.

**४. पाण्याचा जास्त वापर :**

हॉटेल व्यवसायामध्ये जास्त पाणी वापरले जाते आणि पाण्याचा अपव्यय होतो सध्याच्या परिस्थितीमध्ये पाण्याची टंचाई जास्त आहे. त्या कारणाने पाण्याचा काटकसरीने वापर केला पाहिजे.

**समस्या :**

१. हॉटेल व्यवसायात दिवसेंन – दिवस खर्चात वाढ होत चाललेली दिसते.

२. सुशिक्षित बेरोजगाराची संख्या या क्षेत्राकडे वळताना दिसत आहे.

३. हॉटेल व्यवसाय हा वेळ खावू आहे.

**निष्कर्ष :**

१. उत्पन्न, खर्च
२. रोजगार निर्मीती
३. शिक्षणाबाबत: कमी शिक्षण

**संदर्भ :**

१. Google या दुय्यम साधानांच्या आधारे.

२. बिजवडी गावातील हॉटेल मालकाची प्राथमिक मुलाखत.

# *नांव :- मत्स्यव्यवसायातून स्वयंरोजगार निर्मिती*

*नांव :- नगरे शितल सुनिल*
Roll No. 134, MA – II
Mob No :- 9325770753

---

*१. प्रस्तावना :-*

*महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील लोकांची उपजीवीका ही मासेमारी व्यवसायावर देखील चालते. महाराष्ट्रात सागरी पाण्यात व गोडया पाण्यात मासेमारी चालते. ती प्रामुख्याने गोडया पाण्यात २३ टक्के आणि सागरी पाण्यात ७७ टक्के मासेमारी व्यवसाय चालतो.*

*महाराष्ट्रात प्रामुख्याने बेजारीची समस्या मोठया प्रमाणात भेडसावत आहे. त्यांना रोजगाराची गरज जास्त प्रमाणात आहे. म्हणून तरुण पिढी जिकडे रोजगार मिळेल तिकडे धावत आहेत.*

*ग्रामीण भागात मासेमारी व्यवसाय हा हंगामानुसार चालतो. मासेमारी हा नारळी पोर्णिमेपासून चालू होतो यामध्ये छोटया जाळयांपासून मोठया जाळयांपर्यत गुंतवणूक करावी लागेत. माशांचा वडाप हा मासेमारीचा प्रकार आहे. यामध्ये १५ ते २० लोकांना रोजगार मिळतो तो प्रत्येक आठवडयाला त्यांना वेतन मिळते. ते वेतन माशाच्या उत्पन्नापासून वेगवेगळे असते तरुणांना पुर्ण गरज भागून पैशाची बचत होते त्यामुळे मासेमारी हा व्यवसाय रोजगार निर्मीतीसाठी अतिशय छान आहे.*

*२. विषयाचे महत्व :-*

*१) माशांच्या उत्पदनात भारताचा जगात तिसरा क्रमांक लागतो त्यामुळे हा विषय अधिक व्यापक झालेला आहे.*

*२) जगात माशांच्या २१००० जाती आहेत.*

*३) ग्रामीण भागात निम्मी लोकसंख्या ही मासेमारी व्यवसायात गुंतलेली आहे.*

*३. उद्देश :-*

*१) मत्स्यव्यवसायाबद्दल परिपूर्ण माहिती जाणून घेणे.*

*२) मत्स्यव्यवसाय कोण कुठे व कसा करतात आणि किती प्रमाणात केला जातो याची माहिती करुन घेणे.*

*३) स्वयंरोजगारातून रोजगार निर्मीतीतील बदलांचा अभ्यास करणे.*

*४. संशोधन पद्धती व व्याप्ती :-*

*१) सर फ्रान्सीस डे या शास्त्रज्ञाने भारतीय माशांचा सचित्र कोश तयार केला आहे.*

*२) या ग्रथांनुसार भारतात १६०० तर महाराष्ट्रात खारया पाण्यात ४५०, गोडया पाण्यात १५० प्रजाती सापडतात.*

*३) भारताच्या स्थुल राष्ट्रीय उत्पन्नात मत्स्योत्पादनाचा वाटा १ टक्के आहे.*

*४) देशातील १४० लाख लोक या व्यवसायत गुंतलेले आहेत.*

*५. विश्लेषण :-*

*१) मासेमारीचा व्यवसाय साखळीप्रमाणे आहे.*

२) प्राथमिक क्षेत्रात मासे पकडणे ते दलाल मार्फत विकणे नंतर मार्केटमधील व्यापायापर्यंत त्या माशांचे हस्तांतरण होते.

३) नंतर माशांचे दळणवळण शहरे व महानगरपालिका यांच्याकडे होते.

६. माशांच्या प्रकारानुसार वर्गीकरण :-

| अ.क्र. | माशांचे प्रकार | बाजार भाव |
|---|---|---|
| १ | चिलापी | ७५ ते ८० रु |
| २ | कानस | ११० रु |
| ३ | रोहू | २५० रु |
| ४ | कटला | २५० रु |
| ५ | सफरनेस | २०० रु |
| ६ | मिरगेल | १५० रु |
| ७ | आहेर | २५०० ते ५००० रु |
| ८ | शिंगडा | १८० ते १९० रु |
| ९ | गुगळी | ४५० रु |
| १० | वाम | ४५० ते ५०० रु |
| ११ | मरळ | ५०० ते ५५५ रु |

वरील तक्त्याप्रमाणे माशांच्या वर्गीकरणात बदल आहे. यामध्ये गोडवा मासा व खवली मासा असे प्रकार पडतात. वरील तक्त्यातील चिलापी, कानस, रोहू, कटला हे खवली मासे आहेत. तसेच अ क्र. ८, ९, १० व ११ हे गोडवा मासे आहेत.

७. माशांची जीवनपध्दती :-

१) मासा हा जलचर प्राणी असून तो कल्ल्यांद्वारे श्वसन करतो.

२) नाकामुळे गंधज्ञान होते, तर परांच्या सहाय्याने पोहतात.

३) शेपटीचा उपयोग दिशा बदलण्यासाठी होतो.

४) खवल्यांमुळे क्षारयुक्त पाणी माशांच्या शरीरात प्रवेश करु शकत नाही.

५) माशांना डोळयांमुळे संवेदना येते.

८. माशांतील घटक :-

१) टक प्रमाण, पाणी, प्रथिने, स्निग्ध पदार्थ, खनिज पदार्थ, हे घटक असतात.

२) माशांच्या चरबीत पॉल, अनसॅटयुरेटेड फॅटी ॲसीडचे प्रमाण जास्त असल्याने रक्तवाहिण्यांतील कोलेस्ट्रॉलचे प्रमाण वाढत नाही.

९. रोजगार निर्मीतीवरुन वर्गीकरण :-

१) माशांच्या व्यवसायात बायका व मानसे या दोघांनाही रोजगार प्राप्त होतो.

२) माशांच्या निरनिराळया उत्पन्नावरुन वेगवेगळा रोजगार प्राप्त होत असतो.

| अ.क्र. | कामे | संख्या | वेतन |
|---|---|---|---|
| १ | मासे निवडणे | ७ | माशांच्या उत्पन्ना नुसार |

| | | | |
|---|---|---|---|
| २ | नाव चालवणे | २ | रोजगार निरनिराळा |
| ३ | जाळी टाकणे | ३ | |

यामध्ये दिवसावर देखील रोजगार मिळतो आणि दिवसाच्या माशाच्या उत्पन्नावर देखील रोजगार मिळतो.
बायकांना दिवसावर १५० रु आणि माणसांना ४०० रु एवढा रोजगार मिळतो.
यामधुन १५ ते २० लोकांना रोजगार मिळतो माशाच्या उत्पन्नानुसार बायका व मानसे यांना सारखाच रोजगार मिळतो.

१०. माशांचे रोग :-

१) पाण्यात ऑक्सीजनचे प्रमाण वाढल्यास माशांना पॉपआय हा आजार होतो.

२) जीवाणूमुळे माशांना अल्सर व ड्रॉप्सी हे रोग होतात.

३) नैसर्गिक परिसंस्थामध्ये माशांची गर्दी होत नाही. ते आपोआप विखुरलेले असतात मात्र गर्दीत कोंबल्यास ताण येऊन ते रोगगृस्त होतात.

४) आनुवांशिक रोग

५) पोषक द्रव्यांच्या कमतरतेमुळे होणारे रोग

६) पर्यावरणीय कारणाने होणारे (प्रकाश, तापमान, क्षारता, आणि ऑक्सीजन, नैसर्गिक आणि मानवनिर्मीत प्रदुषणे) हे रोग आहेत.

११. माशांच्या व्यवसायानुसार हंगामी उत्पन्न :-

| अ.क्र. | मासेमारी व्यवसायीकांचे नांव | उत्पन्न |
|---|---|---|
| १ | सुनिल तुळजीराम नगरे | १,५०,०००/- |
| २ | नंदकुमार चमरे | २,००,०००/- |
| ३ | बापू नगरे | १,००,०००/- |

वरील माहितीवरुन प्रत्येक व्यवसायीकाचे मासेमारी व्यवसायातील हंगामी उत्पादन निरनिराळे आहे. यामध्ये नाव, जाळी व कामगार यांचे वेतन / हिस्सा निरनिराळा असतो.

१२. व्यवस्थापन :-

१) माशांना चांगल्या पोषणासाठी नदी, तलाव, ओढा यामध्ये आढळतात.

२) तसेच आता आधुनिक पद्धतीने शेतकरी व व्यावसायीक शेततळी करतात यामध्ये माशांचे संगोपन केले जाते.

३. यामध्ये वेगवेगळया प्रजातीचे मासे सोडले जातात.

१३. माशांचे खादयपदार्थ :-

| अ.क्र. | खादयपदार्थ |
|---|---|
| १ | राळ तांदुळ |
| २ | ज्वारी बाजरी |
| ३ | भुसा |
| ४ | बारीक शेंगदाणा |
| ५ | शेवाळे |

*वरीलप्रमाणे माशांचे खादयपदार्थ वेळेनुसार ठेवल्यास माशांची पोषन होते. त्यांची वाढ चांगल्या प्रकारे होते.*

*१४. माशांची स्वच्छता :-*

*१) शेततळे असल्यास वेळेवर पाणी बदलणे तसेच माशांना त्रास होणार नाही किंवा ताण निर्माण होऊ नये म्हणून अन्न पदार्थ स्वच्छ देणे.*

*२) शेवाळयांची बदलाबदल करणे.*

*३) शिळे अन्नपदार्थ टाकु नये.*

*४) नदीत परिसंख्या मोठी असल्याने त्यांचा आवाडा हा माठा असल्याने लोक खराब सांडपाणी तसेच घनकचरा टाकतात ते प्रमाण नाहीसे करावे.*

*१५. समस्या :-*

*१) दरवर्षी मासेमारी करणाया लोकांना खुप समस्या येतात उदा. पाण्याचा अपुरेपणा, याऊलट प्रचंड विस्फोटक पाणी, त्यामुळे त्यांना हा व्यवसाय जीवघेणा आहे.*

*२) सागरी पाण्यात जलवाहतुकीमळे होणारी तेलगळती विषारी वायु यामुळे सागरी माशांचे जीवन धोक्यात आले आहे.*

*३) तसेच विषारी घनकचरा, सांडपाणी, जलप्रदुषण यामुळे माशांच्या प्रजाती नष्ट होऊन दुर्मिळ होत चालल्या आहेत. त्यामुळे मत्स्यव्यवसायीकांच्या उपजीविकेवर त्याचा विपरीत परिणाम झालेला आहे.*

*१६. निष्कर्ष :-*

*१) मासेमारी हा अतिशय चांगला रोजगार मिळवणारा स्वयंरोजगार आहे.*

*२) यामध्ये १५ ते २० लोकांना रोजगार मिळतो.*

*३) भांडवलामध्ये जास्त पैसा गुंतवावा लागत नाही.*

*४) ग्रामीण भागात जास्तीत जास्त लोक या व्यवसायात गुंतलेले आहेत.*

*१७. शिफारशी :-*

*१) शासनाने मासेमारी व्यवसायासाठी अनुदान द्यावे.*

*२) माशांचे बाजारभाव सतत बदलत राहतात ते स्थिर ठेवावेत.*

*१८. संदर्भ :-*

*१) प्रगत मासेमारी व्यावसायीक*

*२) भोई लोक खानोटा*

*३)* Google

*४) वर्तमान पत्रे, पुस्तके*

# अंबिका केटर्स रोजगार निर्मितीचा प्रभावी मार्ग

**सागर दिपक बनकर**
**एम.ए. २ अर्थशास्त्र**
**मो. नं. ९६६५८००५३२**

**प्रस्तावना**

सध्याच्या काळात मनुष्याची धावपळ अतिशय वेगवान झाली आहे. या धावपळीच्या जीवनात मनुष्याला आपल्या घरगुती कार्यक्रमात देखील वेळ देता येत नाही. तो कोणत्यांना कोणत्या कामामध्ये गुंतलेल्या असतो. परंतु तरूण वर्ग हा कामापासून वंचित राहिलेला दिसूतो. त्यामुळे तरूण वर्ग हा बेरोजगारीच्या विळख्याखाली आहे. तरूण वर्ग हा उच्चशिक्षीत असून देखील त्यांना नोकरी नसल्यामुळे बेरोजगारी निर्माण होते.

या बेरोजगारीवर मात करण्यासाठी उत्तम उपाय म्हणजेच 'स्वयंरोजगार.' स्वयंरोजगार म्हणजे स्वत:चा व्यवसाय निर्माण करणे. स्वयंरोजगारामध्ये अनेक व्यवसायांचा सामावेश होतो. त्यामध्ये कोणत्याही एका व्यवसायाची निवड करून स्वयंरोजगारातून रोजगार निर्माण करू शकतो. बेरोजगारीवरती उत्तम पर्याय म्हणून स्वयंरोजगार महत्वाची भूमिका बजावतो. स्वयंरोजगारामध्ये केटरिंग व्यवसाय हा एक स्वयंरोजगार आहे. केटरिंग व्यवसाय म्हणजेच विविध कार्यक्रमामध्ये, संभारंभामध्ये जेवण बनविणे. या केटरिंग व्यवसायाची सुरूवात ही इतिहासपुर्व काळापासून झाली आहे. मनुष्याची दैनंदिन गरज म्हणजे अन्न (जेवण) हे महत्वाचे आहे. जेवणाचे पदार्थ बनविण्याच्या केटरिंग व्यवसायाची वाढ ही २० व्या शतकात ही मोठया प्रमाणात झाली. लग्न संभारंभ, वाढदिवस, साखरपुढा, बारसे तसेच इतर कार्यक्रम देखील वाढू लागले. त्यामुळे केटरिंग व्यवसायाची गरज वाढू लागली. या व्यवसायातून स्वयंरोजगारातून रोजगार मोठया प्रमाणत निर्माण झाला.

**'एखादया व्यवसायाचे निरीक्षण करत असताना तो व्यवसाय स्वत: निर्माण करून इतरांना रोजगार निर्माण करणे त्यास स्वयंरोजगार असे म्हणतात'.**

**उद्दिष्टे :**

१. अंबिका केटर्स या व्यवसायातील रोजगार निर्मितीचा अभ्यास करणे.

२. अंबिका केटर्स या व्यवसायातील समस्या व उपायांचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :**

सदर अभ्यासासाठी सोलापूर जिल्हयामधील मौजे अकलूज गावातील अंबिका केटर्स या व्यवसायातून स्वयंरोजगार कसा निर्माण झाला व बेरोजगारीवर कशी मात करण्यात आली आहे. याचा अभ्यास निरीक्षण, मुलाखत, माहिती या पध्दतींचा आधार घेण्यात आलेला आहे.

**विश्लेषण :**

मौजे अकलूज ता. माळशिरस येथील अंबिका केटर्स व्यवसाय या व्यवसायिकांकडून सदर व्यवसायाची माहिती, निरीक्षण, चर्चा याद्वारे घेतली. या व्यवसायातून कशा प्रकारे फायदा झाला. हा व्यवसाय स्वयंरोजगारसाठी चांगल्या प्रकारे योग्य आहे याची माहिती मिळाली.

अंबिका केटर्स या स्वयंरोजगारातून रोजगार निर्मिती झाली. या व्यवसायाकांकडून माहितीच्या आधारे स्पष्ट झाले. अंबिका केटर्स या व्यवसायामध्ये विविध कार्यक्रम, संमारंभ यांचे जेवण बनविण्याची आर्डर घेणे हे काम केले जाते. जेवण तयार करण्यासाठी अनेक कामगारांची गरज भासते त्यातून त्यांना रोजगार निर्माण होतो. तसेच जेवण बनविण्यासाठी लागणाऱ्या भांडी यापासून आपण मिळाणारा मोबदला घेता येतो. लग्न संमारंभ, इतर कार्यक्रम या जेवण वाढण्यासाठी वाढपिंना देखील रोजगार निर्माण झालेला दिसून येतो.

सुरूवातीच्या काळामध्ये काही मर्यादित भांडवलाची गरज भासली. नंतर मर्यादित भांडवालापासून अधिकाधिक उत्पन्न मिळाले. या व्यवसायिकांच्या मुखाखतीतून असे लक्षात आले की, या व्यवसायातून अनेक तरूणांना तसेच कामगारांना यामधून रोजगार निर्माण झाला. व त्यांचा आर्थिक परिस्थितीत व राहणीमानात बदल घडून आला.

१. या व्यवसायामध्ये जेवण बनविण्यासाठी लागणाऱ्या कामगारांना रोजगार निर्माण केला.

२. या व्यवसायासाठी लागणाऱ्या सर्व साधन—सामुग्रीची पुर्तता केलेचे दिसून आले.

३. या व्यवसायासाठी लागणाऱ्या साधन—सामुग्रीसाठी स्वत:ची जागा उपलब्ध करून घेतली.

या अंबिका केटर्स व्यवसायातून अनेक बेरोजगार तरूण वर्गाला /कामगारांना रोजगार निर्मितीचा मार्ग मिळाला. अंबिका केटर्स हा व्यवसाय स्वयंरोजगारासाठी उत्तम व्यवसाय आहे. पुढील तक्त्याच्या आधारे समजते. या तक्त्यामध्ये मार्च २०१९ या महिन्यातील जेवण बनवलेल्या कामाचे विश्लेषण व त्यापासून मिळालेला नफा हे सांगितले आहे.

**तक्ता क्र. १**

**मार्च २०१९ या महिन्यातील जेवण बनवलेल्या कामाचे विश्लेषण व त्या कामापासून मिळालेला नफा**

| अ.क्र | तपशिल | एकूण उत्पन्न | खर्च | निव्वळ नफा |
|---|---|---|---|---|
| १ | लग्न संमारंभ | १०,५०० | ६,००० | ४,५०० |
| २ | वास्तुशांती | ९,५०० | ५,००० | ४,५०० |
| ३ | साखरपुढा | ७,००० | ४,००० | ३,००० |
| ४ | बारसे | ४,००० | २,००० | १,००० |
| ५ | वाढदिवस पार्टी | ६,००० | ४,००० | २,००० |
| | | **एकुण निव्वळ नफा** | | **१५,०००** |

**संदर्भ : अंबिका केटर्स**

तक्ता क्र. १ वरून अंबिका केटर्स या व्यवसायिकाच्या मार्च २०१९ या माहिन्यातील जवेण बनवलेल्या कामाची मांडणी केली आहे. या महिन्यात झालेल्या संमारंभ कार्यक्रम या कामातून एकुण उत्पन्न, खर्च, निव्वळ नफा याची मांडणी केलेली आहे. तक्त्यामध्ये सर्व प्रथम लग्न संमारंभ या कामाचे एकूण उत्पन्न १०,५०० रू. असून त्याच्या नियोजनांचा खर्च ६,०००रू. आला असून त्यापासून ४,५०० एवढा निव्वळ नफा प्राप्त झालेला आहे. तसेच इतर कार्यक्रमामध्ये झालेला खर्च आणि मिळालेला निव्वळ नफा दर्शविलेला आहे. यातून एका महिन्याचा १५,००० रूपये एवढा एकुण निव्वळ नफा मिळालेला आहे. यामधून असे लक्षात येते की, अंबिका केटर्स हा व्यवसाय आर्थिकदृष्टया चांगल्या प्रकारचा स्वयंरोजगार ठरतो.

**समस्या:**

१. या व्यवसायांमध्ये जवेण बनविण्यासाठी कच्च्यामालाची समस्या निर्माण होते.

२. या व्यवसायात जवेण बनविण्यासाठी लागणाऱ्या कामगारांची कमतरता भासते.

३. जेवण बनविण्यासाठी भांडयांची कमतरता भासते.

**उपाय :**

१. जेवण बनविण्यासाठी कच्चा माल त्याठिकाणी नसेल तर इतर ठिकाणांहून उपलब्ध करता येतो.

२. जेवण बनविण्यासाठी लागणाऱ्या कामगारांची कमतरता ही इतर ठिकाणाहून कामगारांना बोलवून त्याठिकाणी पुर्तता केली जाते.

३. जेवण बनविण्यासाठी लागणाऱ्या भांडयांची कमतरता भासल्यास इतर ठिकाणाहून भाडोत्री भांडी उपलब्ध करता येतात.

**निष्कर्ष :**

१. या स्वयंरोजगाराच्या आधारे इतर १० ते १५ कामगारांना रोजगार निर्माण झाला.

२. जेवण बनविण्यासाठी लागणाऱ्या भांडयापासून ती भाडोत्री रूपाने देऊन मोबदला मिळवला.

३. लग्न संमारंभ, वास्तुशांती, साखरपुढा जेवण वाढण्यासाठी लागणाऱ्या ३० ते ४० वाढप्यांना रोजगार प्राप्त झाला.

**संदर्भ :**

१. अंबिका केटर्स या व्यवसायिकाची प्राथमिक मुलाखतीची आधारे.

२. इंटरनेट

# ''ज्युस सेंटर : एक स्वयंरोजगाराची संधी''

**चि. सत्यवान गणेश कोरे**
**वर्ग : एम.ए द्वितीय वर्ष अर्थशास्त्र**
**Email: satywankore111@gmail.com**

**प्रस्तावना :**

आज जगामध्ये भारतीय अर्थव्यवस्था ही एक क्रृषीप्रधान अर्थव्यवस्था मानली जाते. तसेच भारतीय अर्थव्यवस्था ही मिश्र अर्थव्यवस्था आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत काही उत्पादक संस्था हया शासकीय/सरकारी आहेत तर काही उत्पादक संस्था हया खाजगी मालकीच्या आहेत. त्यामुळेच भारतीय अर्थव्यवस्था ही मिश्र अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये शेतीचा वाटा हा एकुण जी.डी.पी च्या १८ टक्के आहे. त्यामुळे शेतीवर ५०टक्के रोजगार अवलंबुन आहे. भारतातील ६० ते ६५ टक्के लोक आज शेती हाच मुख्य व्यवसाय करतात. त्यामुळे आज भारतात वाढती लोकसंख्या लोकांना बेरोजगार बनवत आहे व बेरोजगारीचा प्रश्न निर्माण करत आहे. आज भारताची लोकसंख्या जवळपास १३० कोटीच्या आसपास आहे. त्यामुळे देशात बेरोजगारीचा दर ही मोठया प्रमाणात वाढला आहे. देशातील अनेक सुशिक्षीत तरूणांना नोक-या मिळत नाहीत. त्यामुळे भारतात बेरोजगारीमध्ये मोठया प्रमाणात वाढ होत आहे. सन २०१८ चा ३.५२ टक्के इतका बेरोजगारीचा दर आहे. (इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन) तसेच हा बेरोजगारीचा दर भारतातील ४५ वर्षातील उच्चांक आहे. भारतात आज १८.६ दशलक्ष लोकांना नोकरी नाही. त्यामुळे भारतातील तरूणांना बेरोजगारी हा ही मोठा प्रश्न आहे. त्यामुळे तरूणांना मिळेल ती नोकरी खपु कमी पगारात करावी लागत आहे. भारतीय तरूणांना बेरोजगारीवर एक उपाय म्हणून स्वयंरोजगार हा खुप मोठा पर्याय आहे. त्यामुळे युवकांना स्वत:चा व्यवसाय ही करता येतो आणि रोजगार निर्मीती ही करता येते.

**उद्देश :**

१) बेरोजगारीत स्वयंरोजगार निर्माण करून स्वत:चा व्यवसाय उभारणे.

२) ज्युस सेंटर या व्यवसायातील रोजगार संधीचा शोध घेणे.

**संशोधन पध्दती :**

या संशोधन पेपरसाठी टेंभूर्णी येथील करमाळा चौकातील शिवशंभो ज्युस सेंटर या व्यवसायकाकडून ज्युस सेंटर या व्यवसायातुन स्वयंरोजगार कसा निर्माण झाला व बेरोजगारीवर कशी मात करता येईल याचा अभ्यास, निरीक्षण, मुलाखत व माहिती यातुन घेतला आहे.

**विश्लेषण :**

टेंभूर्णी ता. माढा येथील करमाळा चौकात असलेले शिवशंभो ज्युस सेंटर या व्यवसायाकडून सदर व्यवसायाची माहिती, निरीक्षण, चर्चा याद्वारे घेतली या व्यवसायातुन कसा फायदा होतो व हा व्यवसाय स्वयंरोजगारासाठी कितपत योग्य आहे याची माहिती पुढीलप्रमाणे व्यवसायीकाने दिली.

१) या व्यवसायासाठी शाळा, महाविदयालय, न्यायालय, पर्यटन स्थळे, तसेच इतर शासकीय कार्यालये अशी अनेक ठिकाणे उपलब्ध असतात यामुळे व्यवसाय चांगला चालतो.

२) या व्यवसायासाठी मिक्सर, ज्युसर, डी फ्रीज, गाडा किंवा छोटा हत्ती गाडी वस्तु पाहिजेत.

३)ज्युस सेंटर या व्यवसायाच्या कुल्फी, आईस्क्रीम, लस्सी, मठठ्, इत्यादी जोड व्यवसाय व्यवसायीकाला आर्थिक नफा मिळवुन देतात.

४) ज्युस सेंटर या व्यवसायाला जास्त मोठया प्रमाणात जागेची गरज नसते

**ज्युस सेंटर या व्यवसायाचे आर्थिक उत्पादन खर्च, उत्पन्न व नफा याचे अर्थशास्त्र:**

ज्युस सेंटर या व्यवसायासाठी जर स्वत:चा गाळा किंवा भाडयाचा गाळा किंवा ५ बाय ५ ची टपरी किंवा एखादे गाडी ज्यामध्ये ज्युस सेंटरच्या वस्तु बसु शकेल त्यामध्ये हा व्यवसाय केला जातो.

शिवशंभो ज्युस सेंटर टेंभूर्णी, ता. माढा या व्यवसायातील उत्पादन खर्च व उत्पन्न व नफा पुढील प्रमाणे.

**तक्ता क्र. १ ज्युस प्रकारातील खर्च आणि विक्री वर्गीकरण.**

| अ.नं | तपशिल (ज्युसचा प्रकार) | प्रति ग्लास खर्च | विक्री | निव्वळ नफा |
|---|---|---|---|---|
| १ | मॅंगो ज्युस (आंबा) | ०५ रूपये | २० रुपये | १५.०० रूपये |
| २ | पायनापल | ०५ रूपये | २० रुपये | १५.०० रूपये |
| ३ | लिंबु सरबत | ०३ रूपये | १० रुपये | ०७.०० रूपये |
| ४ | चिक्कू | ०८ रूपये | २० रुपये | १२.०० रूपये |
| ५ | लस्सी | ०५ रूपये | २० रुपये | १५.०० रूपये |
| ६ | आईसस्क्रीम | ०७ रूपये | १५ रुपये | ०८.०० रूपये |
| ७ | कुल्फी | ०६ रूपये | १० रुपये | ०४.०० रूपये |
| ८ | मठठ्ा | ०४ रूपये | १५ रुपये | ११.०० रूपये |

**संदर्भ : शिवशंभो ज्युस सेंटर टेंभूर्णी जि. सोलापुर**

तक्ता क्र. १ वरून ज्युस सेंटर या व्यवसायाचा उत्पादन खर्च आणि उत्पन्न याचा सरासरी हिशोब केला असता ४५ टक्के उत्पादन खर्च आहे. आणि ५५ टक्के हा निव्वळ नफा आहे.आज देशामध्ये एक बेरोजगारीची मोठी समस्या निर्माण झाली आहे. देशामध्ये अनेक सुशिक्षीत तरूण बेरोजगार आहेत त्यामुळे सुशिक्षित तरूणांनी नोकरीच्या मागे न लागता स्वयंरोजगार निर्माण केला पाहिजे या स्वयंरोजगारातुन किंवा व्यवसायातून चांगल्या प्रकारे नफा कमावता येतो.आज गावाच्या मध्यवर्ती ठिकाणी, तालुक्याच्या ठिकाणी, महाविदयालय, शाळा, न्यायालय, कचेरी, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका व इतर शासकीय कार्यालयाशेजारी ज्युस सेंटर हा स्वयंरोजगार किंवा व्यवसाय चांगल्या प्रकारे चालू शकतो.

**समस्या :**

१) ज्युस सेंटर हा हंगामी व्यवसाय आहे.

२) प्रतिस्पर्धी कंपन्यांच्या वस्तुंच्या किंमतीबरोबर स्पर्धा.

३) कच्च्या मालाचा तुटवडा.

**निष्कर्ष :**

१) ज्युस सेंटर हा बेरोजगारीवर उपाय म्हणून एक चांगला स्वयंरोजगार किंवा व्यवसाय आहे.
२) कमीत कमी भांडवलात हा व्यवसाय चालू होतो. जास्त भांडवलाची गरज नाही.
३) या व्यवसायामध्ये उत्पादन खर्च कमी आणि उत्पन्न किंवा नफा जास्त मिळतो.
४) या व्यवसायासाठी जास्त ज्ञानाची किंवा शिक्षणाची गरज नाही.
५) ज्युस सेंटर हा व्यवसायामुळे कमीत कमी दोन लोकांना रोजगार निर्मीती होते.

**संदर्भ :**

१) सकाळ पेपर.
२) भारतीय अर्थव्यवस्था.
३) google.com.
४) ज्युस सेंटर व्यवसायाकाची मुलाखत.

# मोहन मोबाईल शॉपी स्वयंरोजगार निर्मितीचे साधन

**सोनाली अमृत इंगोले**
**एम. ए. २ अर्थशास्त्र**

**प्रस्तावना :**

स्वयंरोजगार या शब्दाचा अर्थ स्वत:च स्वत:साठी रोजगार उपलब्ध करणे असा होतो. नोकरी न करता स्वयंरोजगाराचा मार्ग पत्करणाऱ्याची संख्या खरेतर खूप कमी आहे. याचे एक कारण म्हणजे समाजामध्ये स्वयंरोजगारांकडे पाहण्याचा दृष्टीकोन तितकासा सकारात्मक नाही. त्यामुळे आणि योग्य माहिती अभावी आजही स्वयंरोजगारापेक्षा नोकरीलाच प्राधान्य दिले जात आहे.

आजकाल आपल्या आयुष्यात अंतर्बाहय बदल होतात. इतके की बहुतेक येत्या काही वर्षामध्ये प्राथमिक शालेय पुस्तकांमधील इतके की बहुतेक येत्या काही वर्षामध्ये प्राथमिक शालेय पुस्तकांमधील अन्न, वस्त्र, निवारा, या मनुष्याच्या मुख्या गरजा आहेत. हे विधान अन्न, वस्त्र, निवारा या डिफॉल्ट गरजासोबत कॉम्प्युटर हायस्पीड, इंटरनेट आणि स्मार्टफोन या मनुष्याच्या मुख्य गरजा आहेत. असे बदलेल दिसते.

ज्गातील पहिला मोबाईल फोन मोटोरोला कंपनीच्या मार्टिन कूपर हया व्यक्तीने १९७३ साली विकसित केला व वापरुन दाखवला १९९० साली जगभरात १.२४ कोटी मोबाईल फोन वापरकर्ते होते. २००९ साली अखेरीज हा आकडा ४.६ अब्ज इतका झाला आहे.

पुढची ती दशक यावर बरच संशोधन झाला आणि ग्रॉफिक्स सन ३ एप्रिल १९७३ ग्राफिक्स आऊट — ला पहिला मोबाईल फोन कॉल झाला. मोबाईल फोन आज प्रत्येकांची गरज बनला आहे. कारण मोबाईलमुळे कोणत्याही व्यक्तींशी .... कधीही आणि कुठेही तुम्ही सहज संपर्क करु शकता... त्यामुळे संवादच हे साधन जगभर लोकप्रिय ठरलं आहे. गरिबांपासून श्रीमंतापर्यंत प्रत्येकाच्या हातात मोबाईल फोन पहायला मिळतो.

**संशोधन पध्दती :**

संशोधन विषयासाठी अकलूज शहरातील मोहन मोबाईल शॉपी या व्यवसाय अभ्यासण्यात घेतला आहे. अकलूज शहरात मोबाईल व्यवसायांचे मोठी बाजारपेठ असल्यामुळे त्यामुळे शहरातील व्यवसाय हा प्रगती पथावर आहेत. हा बेरोजगारीवर मात करण्यासाठी हा रोजगान फार महत्त्वाचा ठरतो.

**उद्दिष्टे :**

१. मोहन मोबाईल शॉपी या व्यवसायांची समस्या जाणून घेणे.

२. योजना सुचविणे.

३. मोहन मोबाईल शॉपीमध्ये रोजगार निर्मितीच्या संधीचा अभ्यास करणे.

**विश्लेषण:**

प्रस्तुत संशोधन अहवालामध्ये मोबाईल व्यवसाय धारकांचा अभ्यास केला आहे. या अहवालामध्ये नमुना निवड करताना फक्त अकलूज शहरांतील मोहन मोबाईल शॉपी व्यवसायांचा अभ्यास केला आहे.

खालील तकत्यामध्ये मोबाईल शॉपीच्या खरेदी — विक्रीचे वर्गीकरण आणि त्यातील फरक स्पष्ट केलेल्या आहेत.

**तक्ता क्र. १**

**खरेदी — विक्री तक्ता**

| अ. क्र. | मोबाईलचे नाव | कंपनीची किंमत | विक्री किंमत | नफा |
|---|---|---|---|---|
| १. | सॅमसंग ग्रॅलक्सी M- 30 | 14.990/- | 15.990/- | 1.000/- |
| २. | MI Az | 15.990/- | 16.990/- | 1.000/- |
| ३ | Vivo V9 | 16.990/- | 17.990/- | 1.000/- |
| ४ | Oppo F9 | 10.999/- | 12.999/- | 2.000/- |
| ५ | I Phone G5- Rosegold | 9.499/- | 12.000/- | 2.500/- |
| ६ | One Plus 6T | 37.99./- | 39.990/- | 2.000/- |
| ७ | Black Berry | 42.990/- | 44.990/- | 2.990/- |
| ८ | Honor 8x | 16.990/- | 18.990/- | 2.000/- |

**संपर्क : मोहन मोबाईल शॉपी अकलूज जि. सोलापूर ता. माळशिरस**

तक्ता क्र. १ नुसार असे दिसून येते की, सॅमसंग ग्रॅलक्सी M - 30 हा मोबाईल कंपनीची किंमत १४.९९०/— रुपये एवढी आहे. तर दुकानातील विक्रीची किंमत १५.९९०/— रुपये या दराने हा मोबाईल विकला जातो तर त्या दुकानदाराचा नफा १.०००/— रुपये होती. MIAZ हा मोबाईल कंपनीची किंमत १५.९९०/— रुपये एवढी होती तर दुकानातील विक्रीची

किंमत १४.९९०/— रुपये दराने मोबाईल विकला जातो. तर त्या दुकानदाराला नफा हा १.०००/— रुपये एवढा होईल.

तसेच vivo v9 हा मोबाईल कंपनीची किंमत ही १६.९९० रुपये एवढी आहे. १७.९९० ही विक्री किंमत आहे. तर त्या दुकानाचा नफा १,००० रुपये एवढा होईल. oppo F9 हा मोबाईल कंपनीची किंमत १०.९९९ रुपये एवढी आहे. तर विक्री किंमत ही ११.९९९ रुपये एवढी आहे. तर त्या दुकानदाराचा नफा हा १.००० रुपये एवढा होईल.

**रोजगार:**

मोहन मोबाईल शॉपी यामध्ये दोन व्यक्तींना रोजगार मिळतो. एका व्यक्तींला दररोज चारशे रुपये या प्रकारे वेतन मिळते. तर दोन व्यक्तींला आठशे रुपये वेतन मिळते. तर एका व्यक्तीला मोहन मोबाईल शॉपी मधून रोजगार उपलब्ध झाला आहे. अकलूजमध्ये एकूण ३३ मोबाईल शॉपी आहे. तर ६६ लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे.

**समस्या :**

**१. ऑनलाईन खरेदी — विक्री समस्या :**

ऑनलाईन खरेदीमुळे बहुतांशी ग्राहक मोबाईल शॉपीतून मोबाईल खरेदी जास्त प्रमाणात करत नाही. मोबाईल शॉपीतून मोबाईल खरेदी जास्त प्रमाणात करत नसल्यामुळे मोबाईल शॉपीकडे दुर्लक्ष मोठया प्रमाणात होत आहे. कित्येक वेळा ऑनलाईन खरेदीमुळे धोका भरपूर प्रमाणात होत असल्याचे दिसून येते. ग्राहक जे वस्तू खरेदी करतो ती वस्तू ग्राहकांना मिळत नाही. तया बदल्यात दुसरी वस्तू मिळते. त्यामुळे ऑनलाईन खरेदी ही नुकसान कारक ठरते. त्यामुळे वेळपण जातो आणि पैसापण भरपूर प्रमाणात जातो.

**२. गुंतवणूक खर्च : (जास्त) :**

मोबाईल खरेदी करण्यासाठी ग्राहकांना भरपूर प्रमाणात गुंतवणूक करावी लागते. गुंतवणूक जेवढी जास्त असेल तेवढा मोबाईल चांगल्या प्रकारे घेता येतो. गुंतवणूक कमी असेल तर मोबाईल चांगला मिळत नाही. किंवा लवकर बिघडतो. मोबाईल ही आजच्या काळातील गरज असल्यामुळे गरिबांना सुध्दा जासत प्रमाणात मोबाईल खरेदी करण्यासाठी गुंतवणूक करावी लागते.

**३. कमी अनुभवी कामगार :**

मोबाईल शॉपीमध्ये कामगार हा अनुभवी असला पाहिजेत. मोबाईल शॉपीमध्ये कामगार हा कमी अनुभवी असला तर त्याला मोबाईल खरेदी – विक्री करण्यासाठी समस्या उद्भवतात कामगार हा कमी अनुभवी असेल तर त्याचा नफा कमी किंवा तोटयाला सामोरे जावे लागते.

**निष्कर्ष / उपाय :**

**१. ऑनलाईन खरेदी – विक्री :**

आजकाल मोठमोठया शहरामध्ये ऑनलाईन मोबाईल खरेदी मोठया प्रमाणात केला जातो. त्यामुळे ग्राहकांना स्वस्त दरात मोबाईल मिळतो. आणि ऑनलाईन मोबाईल घर पोच मिळतो. त्यामुळे ऑनलाईन खरेदी – विक्री ही पध्दत अतिशय महत्त्वाची ठरलेली आहे.

**२. गुंतवणूक खर्च :**

मोहन मोबाईल शॉपीमधुन खरेदी करण्यासाठी ग्राहकांनी जेवढी जास्त गुंतवणूक केली तेवढी जास्त मोबाईल चांगला मिळतो.

**३. अनुभवी कामगारांचा अनुभव :**

मोहन मोबाईल शॉपी दुकानामध्ये कामगार हा अनुभवी असला पाहिजेत. कामगारांचे शिक्षण कमीत – कमी दोन वर्षांचा दुकानाचा अनुभव असला पाहिजेन कामगारांचे शिक्षण कमीत – कमी बारावी असावे. कामगार हा बोलता असावा. कामगाराला अनुभव असेल तर नफा मोठया प्रमाणात मिळतो.

**४. रोजगार निर्मिती :**

मोहन मोबाईल शॉपीमध्ये दोन रोजगारांना काम मिळतो. त्या दोन कामगारांना त्याच्या मुलभूत गरजा पूर्ण करता येईल.

**संदर्भ सूची :**

१. मोबाईल शॉपी व्यवसायकांची मुलाखत

२. Google.com

# ''झेरॉक्स सेंटर - एक स्वयंरोजगाराची संधी''

**श्री.तुषार लक्ष्मण जगताप**
**वर्ग : एम.ए द्वितीय वर्ष अर्थशास्त्र**
**Email: jagataptushar5678@gmail.com**

**प्रस्तावना :**

आज जगामध्ये भारतीय अर्थव्यवस्था ही एक कृषीप्रधान अर्थव्यवस्था मानली जाते. तसेच भारतीय अर्थव्यवस्था ही मिश्र अर्थव्यवस्था आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत काही उत्पादक संस्था हया शासकीय/सरकारी आहेत तर काही उत्पादक संस्था हया खाजगी मालकीच्या आहेत. त्यामुळेच भारतीय अर्थव्यवस्था ही मिश्र अर्थव्यवस्था म्हणून ओळखली जाते. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये शेतीचा वाटा हा एकुण जी.डी.पी च्या १८ टक्के आहे. त्यामुळे शेतीवर ५० टक्के रोजगार अवलंबुन आहे. भारतातील ६० ते ६५ टक्के लोक आज शेती हाच मुख्य व्यवसाय करतात. त्यामुळे आज भारतात वाढती लोकसंख्या लोकांना बेरोजगार बनवत आहे व बेरोजगारीचा प्रश्न निर्माण करत आहे. आज भारताची लोकसंख्या जवळपास १३० कोटीच्या आसपास आहे. त्यामुळे देशात बेरोजगारीचा दर ही मोठया प्रमाणात वाढला आहे. देशातील अनेक सुशिक्षीत तरूणांना नोक-या मिळत नाहीत. त्यामुळे भारतात बेरोजगारीमध्ये मोठया प्रमाणात वाढ होत आहे. सन २०१८ चा ३.५२ टक्के इतका बेरोजगारीचा दर आहे. (इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन) तसेच हा बेरोजगारीचा दर भारतातील ४५ वर्षातील उच्चांक आहे. भारतात आज १८.६ दशलक्ष लोकांना नोकरी नाही. त्यामुळे भारतातील तरूणांना बेरोजगारी हा ही मोठा प्रश्न आहे. त्यामुळे तरूणांना मिळेल ती नोकरी खपु कमी पगारात करावी लागत आहे. भारतीय तरूणांना बेरोजगारीवर एक उपाय म्हणून स्वयंरोजगार हा खुप मोठा पर्याय आहे. त्यामुळे युवकांना स्वत:चा व्यवसाय ही करता येतो आणि रोजगार निर्मीती ही करता येते.

**उददे्श :**

१) बेरोजगारीत स्वयंरोजगार निर्माण करून स्वत:चा व्यवसाय उभारणे.

२) झेरॉक्स सेंटर या व्यवसायातील रोजगार संधीचा शोध घेणे.

**संशोधन पध्दती :**

या संशोधन पेपरसाठी इंदापुर जि. पुणे येथील इंदापुर न्यायालयासमोरील तुषार झेरॉक्स या दुकान व्यवसायकाकडून झेरॉक्स सेंटर या व्यवसायातुन स्वयंरोजगार कसा निर्माण झाला व बेरोजगारीवर कशी मात करता येईल याचा अभ्यास, निरीक्षण, मुलाखत व माहिती यातुन घेतला आहे.

**विश्लेषण :**

इंदापुर जि. पुणे येथील इंदापुर तालुका दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर असलेले तुषार झेरॉक्स या दुकान व्यवसायाकडून सदर व्यवसायाची माहिती, निरीक्षण, चर्चा याद्वारे घेतली या व्यवसायातुन कसा

फायदा होतो व हा व्यवसाय स्वयंरोजगारासाठी कितपत योग्य आहे याची माहिती पुढीलप्रमाणे दुकानदारांनी दिली.

१) या व्यवसायासाठी शाळा, महाविदयालय, न्यायालय, कचेरी, तसेच इतर शासकीय कार्यालये अशी अनेक ठिकाणे उपलब्ध असतात यामुळे व्यवसाय चांगला चालतो.

२) या व्यवसायासाठी कमी किमतीची झेरॉक्स मशिन उपलब्ध आहे. भांडवलास मदत मिळते.

३) झेरॉक्स या व्यवसायाच्या जोडीस स्पायरल बायडिंग, टायपिंग, प्रिंट आऊट, व्हॉटस् प्रिंट आऊट, ऑनलाईन प्रिंट आऊट, केस लॉ हा जोड व्यवसायाचा फायदा व्यवसायीकाला खुप होतो.

४) झेरॉक्स दुकानाला जास्त मोठया प्रमाणात जागेची गरज नसते

५) झेरॉक्स सेंटर या व्यवसायासाठी गाळा, टपरी, छोटा हत्ती सारखी बंदिस्त गाडी इत्यादी वस्तुचा उपयोग केला जातो.

**झेरॉक्स सेंटर या व्यवसायाचे आर्थिक उत्पादन खर्च, उत्पन्न व नफा याचे अर्थशास्त्र:**

झेरॉक्स या व्यवसायासाठी जर स्वत:चा गाळा किंवा भाडयाचा गाळा किंवा ५ बाय ५ ची टपरी किंवा एखादे गाडी ज्यामध्ये झेरॉक्स मशिन बसु शकेल त्यामध्ये हा व्यवसाय केला जातो.

तुषार झेरॉक्स इंदापुर जि.पुणे या दुकानातील उत्पादन खर्च व उत्पन्न व नफा पुढील प्रमाणे.

तक्ता क्र. १

| अ.नं | तपशिल | प्रती पेजेस खर्च | विक्री | निव्वळ नफा |
|---|---|---|---|---|
| १ | ऐ फोर साईज झेरॉक्स प्रति एक बाजु | ६६ पैसे | २ रुपये | ०१.३४ पैसे |
| २ | ऐ फोर साईज झेरॉक्स पाठोपाठ | ९६ पैसे | ३ रुपये | ०२.०४ पैसे |
| ३ | लिगल साईज झेरॉक्स प्रति एक बाजू | ७० पैसे | २ रुपये | ०१.३० पैसे |
| ४ | लिगल साईज झेरॉक्स पाठोपाठ | ०१ रुपये | ४ रुपयु | ०३.०० रुपये |
| ५ | ऐ फोर लॅमिनेशन | ०८ रुपये | २० रुपये | १२.०० रुपये |
| ६ | लिगल साईज लॅमिनेशन | १५ रुपये | ३० रुपये | १५.०० रुपये |
| ७ | ५० पाने स्पारय बायडिंग करणे | १० रुपये | ३० रुपये | २०.०० रुपये |
| ८ | १०० पाने स्पायरल बायडिंग करणे | १५ रुपये | १८ रुपये | ३५.०० रुपये |

संदर्भ : तुषार झेरॉक्स सेंटर, इंदापुर जि. पुणे

तक्ता क्र. १ वरुन झेरॉक्स सेंटर या व्यवसायाचा उत्पादन खर्च आणि उत्पन्न याचा सरासरी हिशोब केला असता ४० टक्के उत्पादन खर्च आहे. आणि ६० टक्के हा निव्वळ नफा आहे.आज देशामध्ये एक बेरोजगारीची मोठी समस्या निर्माण झाली आहे. देशामध्ये अनेक सुशिक्षीत तरुण बेरोजगार आहेत त्यामुळे सुशिक्षित तरुणांनी नोकरीच्या मागे न लागता स्वयंरोजगार निर्माण केला पाहिजे या स्वयंरोजगारातुन किंवा व्यवसायातून चांगल्या प्रकारे नफा कमावता येतो. आज गावाच्या ठिकाणी, तालुक्याच्या ठिकाणी,

महाविदयालय, शाळा, न्यायालय, कचेरी, पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका व इतर शासकीय कार्यालयाशेजारी झेरॉक्स सेंटर हा स्वयंरोजगार किंवा व्यवसाय चांगल्या प्रकारे चालू शकतो.

**निष्कर्ष :**

१) झेरॉक्स सेंटर हा बेरोजगारीवर उपाय म्हणून एक चांगला स्वयंरोजगार किंवा व्यवसाय आहे.

२) कमीत कमी भांडवलात हा व्यवसाय चालू होतो. जास्त भांडवलाची गरज नाही.

३) या व्यवसायामध्ये उत्पादन खर्च कमी आणि उत्पन्न किंवा नफा जास्त मिळतो.

४) या व्यवसायासाठी जास्त ज्ञानाची किंवा शिक्षणाची गरज नाही.

**संदर्भ :**

१) सकाळ पेपर.

२) भारतीय अर्थव्यवस्था.

३) google.com.

४) झेरॉक्स सेंटर दुकान व्यवसायाकाची मुलाखत.

## गिरझणी गावातील पान शॉप व्यवसाय स्वयंरोजगार निर्मितीचे एक साधन

**गणेश लक्ष्मण ढोले**
**एम. ए. २ अर्थशास्त्र**
**रोल क्रमांक : १२६**

---

**प्रस्तावना :**

आजच्या युगात मानवाचे जीवन अतिशय धावपळीचे झाले आहे. मानव हा दिवसेन दिवस जास्त वेळ कामामध्ये गुंतून राहिला आहे. परंतु मानव हा जास्त कामामध्ये गुंतला असून देखील व्यवसायाच्या आहारी गेलेला दिसत आहे. व्यसन म्हणजेच धुम्रपान करणे तंबाखु खाणे इतर पान खाणे इतर व्यवसनाच्या आहारी गेलेला आहे.

यातूनच पान शॉप व्यवसाय निर्माण झाला आहे. पान शॉप हा व्यवसाय स्वयंरोजगार असून त्या मधून रोजगार निर्माण करुन आर्थिक परस्थितीमध्ये बदल घडून आला या पान शॉपीची सुरुवात अनेक काळापासून सुरु आहे. आजच्या काळात तरुण वर्ग हा बेरोजगारीमध्ये जगत आहे. उच्च शिक्षित असून त्याला काम किंवा नोकरी मिळत नाही. याच बेरोजगारी वरती मात करण्यासाठी एक स्वयंरोजगार म्हणून पान शॉप व्यवसाय उत्तम स्वयंरोजगार ठरेल.

बेरोजगारावरती मात करुन आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी स्वत:चा व्यवसाय सुरु करणे म्हणजे स्वयंरोजगार होय.

बेरोजगारीवर उत्तम पर्याय म्हणून स्वयंरोजगार महत्त्वाची भूमिका बजावतो.

**उद्‌देश :**

१. गिरझणी गावातील पान शॉप व्यवसायीक रोजगार निर्मिती अभ्यास करणे.

२. या व्यवसायातील समस्या व त्यावरील उपाय योजनांचा अभ्यास करणे.

**संशोधनपध्दती :**

या संशोधन पेपरसाठी गिरझणी या खेडेगावातील दोस्ती पान शॉपी या व्यवसायामधून स्वयंरोजगार कसा निर्माण झाला याचा अभ्यास निरीक्षण मुलाखत माहितीचा पध्दतीचा आधार घेण्यात आला.

**विश्लेषण :**

सदर अभ्यासासाठी गिरझणी या खेडे गावातील असून तो जि. सोलापूर, ता. माळशिरस येथे आहे. या खेडे गावामध्ये दोस्ती हा पानशॉप व्यवसाय असून त्या व्यवसाय कडून मुलाखत चर्चा व माहितीचा आधार या व्यवसायाची पुर्ण माहिति घेण्यात आली.

१. दोस्ती पानशॉप या व्यवसायाकडून या व्यवसाय नफा व तोटा या विषयीमाहिती मिळाली.
२. पान शॉप या व्यवसाय कमीत कमी जागा लागते. हे त्यांच्या मुलाखतीतून समजले.
३. पान शॉप व्यवसायाला लागणाऱ्या भांडवलाची आवश्यकता मर्यादा स्वरुपाची लागते. पानशॉप व्यवसाय बेरोजारीवरती उत्तम स्वयंरोजगार आहे. हे यांच्या मुलाखतीतून स्पष्ट झाले.

**तक्ता क्र. १**

**पानशॉप व्यवसायातील वस्तुच्या विक्रीतून मिळणारा नफा**

| **अ. क्र.** | **वस्तुचे नाव** | **छापील किंमत** | **नग** | **विक्री किंमत (प्रति नग)** | **निव्वळ नफा** | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गाय छाप | ४५०रु | ४० | १३ रु | 13X40=520 | ७०रु |
| २ | हरीकृष्णा | २२५रु | ५० | ६ रु | 6x50=300 | १५रु |
| ३ | Bristal | ५५ रु | १० | ७ रु | 7x10=70 | १५रु |
| ४ | Gold Flake | ९० रु | १० | १२ रु | 12x10=120 | ३०रु |
| ५ | Gram | ११० रु | १० | १५ रु | 15x10=150 | ४०रु |
| ६ | Classic | १५० रु | १० | १८ रु | 18x10=180 | ३०रु |

**संदर्भ : दोस्ती पान शॉप**

तक्ता क्र. १ नुसार पानशॉप व्यवसायामध्ये काही निवडक वस्तुला समावेश करण्यात आला आहे.या तक्त्यामध्ये वस्तुची छापील किंमत व त्यामध्येमिळणारे नग त्या नगाची विक्री किंमत त्यापासून मिळणारा निव्वळ नफा दर्शविला आहे.

**रोजगार संधी:**

यातूनच पान शॉप या व्यवसायामुळे स्वयंरोजगारातून तीन व्यक्तींना रोजगार निर्माण झाला. यामुळे गिरझणी या गावातील तीन व्यक्तींना रोजगार निर्माण झाला. यामुळे त्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारुन सहाणी भानामध्ये बदल घडून आला.

**समस्या :**

१. पानशॉप व्यवसायामध्ये काही वेळेस कच्चा मालाची समस्या निर्माण होते.

२. पानशॉप व्यवसायमध्ये आतिक्रमण आल्यानंतर पानशॉप दुकान एका ठिकाणावरुन दुसऱ्या ठिकाणी केल्यास समस्या निर्माण होतात.

**उपाय :**

१. पानशॉप व्यवसायामध्ये कच्चामालाची पुर्तता भागवण्यासाठी इतर पानशॉप दुकानातून कच्चा माल घेता येतो.

२. पानशॉप व्यवसायामध्ये अतिक्रमण वेळेस होते. पानशॉप दुसऱ्या ठिकाणी जाते. त्यामुळे दुकान स्वत:ची मालकीची जागा असणे गरजेचे आहे.

**निष्कर्ष :**

१. पानशॉप या व्यवसायामधून चांगला प्रकारे नफा मिळवण्यास मदत झाली.

२. पानशॉप व्यवसायातून रोजगार निर्मिती झाली.

**संदर्भ :**

१. गिरझणी या गावातील दोस्ती पान शॉप या व्यवसायाची मुलाखत.

# अण्णा लसून सोलणी केंद्र स्वयंरोजगाराचे एक माध्यम

**चेतन सर्जेराव चव्हाण**
**एम.ए. २ अर्थशास्त्र**
**मो. नं. ९५५२२२२८४१**

**प्रस्तावना**

कृषी प्रधान देश अशी भारताची ओळख आहे. कृषी व्यवसाय हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. लसून हा जेवनामधील अविभाज्य घटक आहे. आज कालाच्या वेगवान जीवन पध्दतीमुळे लसून सोलण्यासाठी कोणाकडे वेळ नाही. भाजीवाल्याकडे सोललेल्या लसूनांची पाकीटे मिळत आहेत. सोललेल्या लसनांची मागणी उच्चभ्रु वसाहती, डिपार्टमेंटल स्टोअर्स, चायनीज स्टॉल, रेस्टॉरंट, इत्यादी ठिकाणी सोललेल्या लसनांची मागणी जास्त प्रमाणात आहे. ५ ते १० कि.मी. परिसरामध्ये दररोज १०० ते १२० किलो लसून मागणी आहे.

या व्यवसायापासून घरगुती महिलांसाठी आपण स्वयंरोजगार निर्माण करता येतो. ग्रामीण भागातील ४ ते ५ घरगुती महिलांना रोजगार उपब्लध करता येतो. लसनांचा मुळ किंमत, सोलण्यांचा मजुरीचा खर्च, वाहतुकीचा खर्च इत्यादी खर्च वजा जाता किलो मागे २० रूपये एवढा नफा राहतो. यासाठी मशिनरी उपलब्ध आहेत, परंतु बऱ्याच वेळा लसणांच्या पाकळया तुटतात. त्यामुळे ग्राहक हाती सोललेल्या लसून पाकळयांना जास्त प्रमाणात मागणी आहे. हा कमी भाडवंलात करण्यासारखा एक घरगुती व्यवसाय आहे.

**उद्देश**

१. स्वत: संयोजक बनून इतरांना रोजगार उपलब्ध करून देणे.
२. शेतकऱ्यांकडून लसून खरेदी करून जास्त जास्तीत लसून सोलण्यांच्या व्यवसायापासून मोठया प्रमाणात नफा प्राप्त करणे.
३. अण्णा लसून सोलणी केंद्रावर सोललेला लसणांचा मागणी व पुरवठा तसेच समस्या व उपाययोजना यांचा अभ्यास करणे.

**विश्लेषण**

प्रस्तुत संशोधन अहवाल हा **चेतन सर्जेराव चव्हाण** यांच्या शेती पुरक व्यवसायापुरता मर्यादित आहे. प्रस्तुत संशोधन करत असताना **लसून सोलणी केंद्र** यांच्या **सोललेला लसून** या

स्वयंरोजगारावर आधारित आहे. सदर स्वयंरोजगाराची नफा—तोटा व भांडवल याच्या माहितीचा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

**तक्ता क्र.१**

**लसून सोलणी केंद्र होणारा दिवसाचा नफा—तोटा पत्रक वर्गीकरण**

| अ. क्र. | मागणी (किलो) | महिला कामगार | भांडवली खर्च | मजुरी खर्च | निव्वळ नफा |
|---|---|---|---|---|---|
| १ | १० | २ | ७०० | २०० | ५०० |
| २ | १५ | ३ | १०५० | ३०० | ७५० |
| ३ | २० | ४ | १४०० | ४०० | १००० |
| ४ | २५ | ५ | १७५० | ५०० | १२५० |



**संदर्भ : क्षेत्रीय पाहणी**

सदर लसून सोलणी केंद्राच्या तक्तावरून असे दिसून येते की, १० किलो सोललेल्या लसणांच्या मागणीसाठी २ महिला कामगारांची गरज लागते. त्यासाठी लागणारे भाडवंल ७०० रूपये असून त्यावर होणार मजुरी खर्च २०० रूपये आहे. तसेच त्यापासून मिळणारा निव्वळ नफा हा ५०० रूपये आहे. १ किलो लसून सोलून पॅकिंग करण्यासाठी येणारा खर्च हा २० रूपये होतो.

वरील तक्तावरून असे ग्राहय धरता येते की, सोललेल्या लसणांची मागणी वाढल्यास, महिला कामगारांना जास्तीत जास्त प्रमाणात रोजगार उपलब्ध करून देता येतो व त्यापासून मुबलक नफा कमवता येतो. उदा. सोललेले लसून पाकीटे ५० ग्रॅम

**समस्या**

१. लसून सोलण्यासाठी महिला कामगारांची कमतरता भासते.

२. अचानक मागणी कमी झाली असता, सोललेला लसूनांची पाकीटे जास्त दिवस ठेवता येत नाही.

३. मागणी कमी झाली असता किंमतीतील फरकामुळे उत्पादनावरही परिणाम दिसून येतो.

**उपाययोजना :**

**१.** सोललेल्या लसणांची पाकीटे खराब होवू नये म्हणून, फ्रिजरची व्यवस्था करणे.

**२.** कायमस्वरूपी २ महिला कामगार यांना रोजगार उपलब्ध करून देणे.

**निष्कर्ष**

१. अण्णा लसून सोलणी केंद्रावर सोललेला लसणांचा मागणी वाढल्यास जास्त महिलांना रोजगार उपलब्ध होतो.

२. जास्त महिलांना रोजगार उपलब्ध केल्यामुळे लसून केंद्राच्या उत्पादनामध्ये वाढ झाल्याचे दिसून येते.

**सारांश**

प्रस्तुत संशोधन अहवालामध्ये **आण्णा लसून सोलणी केंद्र** यांच्या स्वयंरोजगारीत व्यवसायामध्ये ग्राहक व व्यवसायिक यांच्या मधील खरेदी–विक्री तसेच त्यापासून मिळणारा निव्वळ नफा व भाडवंल खर्च यांचा अभ्यास केलेला आहे. त्यापासून इतर महिला कामगांराना रोजगार मिळालेला दिसून येतो. स्वयंरोजगारातून इतरांना रोजगार निर्मिती केलेली दिसून येते.

**संदर्भ**


१. अण्णा लसून सोलणी केंद्र, आनंदनगर याचे मालक चेतन सर्जेराव चव्हाण यांच्या स्वयंरोजगार व्यवसायावर आधारित.

२. इंटरनेटच्या माध्यातून प्रकाश भोसले उदयोजक सल्लागार यांच्या लेखातून तयार केलेला आहे.

# किराणा व्यवसायातुन स्वयंरोजगाराची संधी

आनंद शामराव बनसोडे
**वर्ग -** एम.ए. व्दितीय वर्ष

- **प्रस्तावना ः**

महाराष्ट्र राज्याने सन **2000**मध्ये रोजगार आणि स्वयंरोजगाराबाबत घोषित केलेल्या धोरणानुसार सुशिक्षित बेरोजगारांना "स्वयंरोजगार योजनाप्रीत्त्यर्थ आवश्यक तो निधी देण्याची जबाबदारी राज्य शासनाने उचलली आहे. स्वंयरोजगाराची उद्दिष्टये व त्यांची यशस्वीता योग्य लाभार्थीच्या निवडीवर अवलंबून असते."

परंतु स्वयंरोजगार म्हणजे काय? शिक्षणानंतर सर्वच जण नोकरीच्या शोधात असतात. पण पुष्कळदा तुम्हाला तुमच्या शैक्षणिक योग्यतेची नोकारी मिळत नाही. अशा परिस्थितीत स्वयंरोजगार हा एक चांगला पर्याय ठरू शकतो.

- **व्याख्या ः**

"स्वयंरोजगार म्हणजे स्वतः स्वतःच्या जीवनाआवश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी लहान प्रमाणावरील उदयोग व्यावसाय नोकरी ऐवजी करणे म्हणजे स्वयंरोजगार होय."

स्वयंरोजगार या शब्दाचा अर्थ "स्वतःच स्वतःसाठी रोजगार उपलब्ध करणे आणि त्याद्वारे अर्थार्जन कारणे असा होतो". नोकरी न करता स्वयंरोजगाराचा मार्ग पत्कारणा-यांची संख्या खरेतर खुप कमी आहे. त्याचे एक कारण म्हणजे समाजामध्ये स्वयंरोजगाराकडे पाहण्याचा दृष्टीकोन तितकासा सकारात्मक नाही. त्यामुळे योग्य माहीती अभावी आजही स्वयंरोजगापेक्षा नोकारीला प्राधान्य दिले जाते. स्वंरोजगारामुळे तुम्ही स्वतःच्या आर्थिक विकासा सोबत इतरांच्या हि आर्थिक विकासास हातभार लावू शकाल स्वाभिमानाने स्वतःचा आर्थिक विकास साधायचा असेल तर स्वयंरोजगारा साराखा दुसरा चांगला मार्ग नाही.

महाराष्ट्र शासनाने राज्यातील बेरोजगार उमेदवारांना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहित करण्याच्या दृष्टीने शासनाकडुन कर्ज उपलब्ध करून देण्यात येते उमेदद्वारांना स्वयंरोजगारा करता कर्ज उपलब्ध करून देणे सुलभ व जलद होण्याकरता स्वयंरोजगार वेब पोर्टल विकसित करण्यात आले आहे.

- **उद्देश ः**

*1.* किराणा दुकान एक उत्तम स्वयंरोजगार या साठीचे महत्त्व अभ्यासणे.

*2.* किराणा दुकानातुन निर्माण होणारा स्वयंरोजगार अभ्यासणे.

*3.* किराणा दुकान व्यावसायामुळे स्वयंरोजगारमधुन निर्माण होणारा रोजगार अभ्यासणे.

- **संशोधन पद्धती :**

या संशोधनासाठी प्राथमिक तथ्यांची मदत घेतली आहे. या संशोधन पेपरसाठी अकलुज येथील सावतामाळी किराणा दुकान व्यवसाया कडुन निर्माण झालेल्या स्वयंरोजगार याचा अभ्यास त्या व्यक्तीची मुलाखत निरिक्षण पद्धतीने केला आहे.

- **विश्लेषण :**

किराणा व्यवसाय हा एक असा व्यवसाय आहे कि त्यामध्ये नित्य उपयोगी वस्तु विकल्या जातात. यामुळे अकलुज येथील सावतामाळी किराणा स्टोअर्स या दुकान मालकाच्या मुलाखती मधून त्यांनी स्वयंरोजगार कसा निर्माण केला याची माहिती घेतली त्यांनी सुरवातीला **200** स्क्वेअर फुट इतक्या जागेमध्ये दुकान सुरू केले. त्यांनी अकलूज मधील एका मोठया व्यापा-यांकडून किराणा मालाची खरेदी केली. पहिल्या दिवशी या दुकान मालकाची मालाची विकी फक्त **100** रूपये इतकी झाली होती.

नंतर हळूहळू ग्राहकांची संख्या वाढत गेल्यानंतर त्यांच्या मालाची विकी वाढु लागली. सध्या त्यांचा नफा **2000** ते **3000** प्रति दिवसाला होतो. सुरूवातीला तो स्वतः मालक एकटा दुकान पाहत असे पण आता त्याच्या दुकानात दोन कामगार आहेत. त्यांनी स्वयंरोजगार निर्माण करून इतरांनाही रोजगार उपल्ब्ध करून दिला. किराणा दुकान व्यवसाय चालु करण्यासाठी निरीक्षणाच्या आधारे मिळालेली माहिती पुढीलप्रमाणे -

**1**. आपण किराणा व्यवसाय हा गर्दीच्या ठिकाणी किंवा ज्या भागामध्ये जास्त लोकसंख्या आहे अशा भागात हा व्यवसाय सुरू करू शकतो.

**2**. किराणा व्यवसाय हा आपण कमी जागेमध्ये सुरू करू शकतो.

**3**. किराणा व्यवसायास जास्त भांडवलाची गरज लागत नाही.

**4**. या व्यवसायासाठी लागणारा मालाची खरेदी याची पुर्ववत माहीती घ्यावी लागते व नंतर माल खरेदी करावा लागतो.

किराणा व्यवसायामुळे स्वयंरोजगारामधुन बेरोजगारांना रोजगार उपल्ब्ध होण्यास मदत होते. किराणा वस्तू ह्या माणसांच्या दैनंदिन जीवनात उपयोगी येणा-या व गरजेच्या वस्तु आहेत. यामुळे हा व्यवसाय कधीच बंद पडू शकत नाही. व या व्यवसायापासुन मिळणारा नफा जास्त असतो.

सावतामाळी किराणा दुकान मालकाच्या मुलाखतीमधुन दुकानातील मिळालेल्या वस्तुंच्या माहिती मधुन काही निवडक वस्तुंची खरेदी किंमत व विक्री किंमत आणि त्यातून मिळणारा नफा हा पुढील तक्त्याद्वारे दर्शविला आहे.

**तक्ता कमांक ः 1**

**खरेदी-विक्री वर्गीकरण**

| अ.क. | वस्तुचे नाव | खरेदि किंमत (प्रति किलो) | विक्री किंमत (प्रति किलो) | मिळणारा नफा (प्रति किलो) |
|---|---|---|---|---|
| 1. | तूर दाळ | 73 रूपये | 80 रूपये | 7 रूपये |
| 2. | साखर | 32.60 पैसे | 35 रूपये | 2.40पैसे |
| 3. | शेंगदाणे | 70 रूपये | 78 रूपये | 8 रूपये |
| 4. | मसूर दाळ | 54 रूपये | 60 रूपये | 6 रूपये |
| 5. | गूळ | 36 रूपये | 40 रूपये | 4 रूपये |
| 6. | शावूदाणा | 60 रूपये | 68 रूपये | 8 रूपये |
| 7. | जेमिनी सुर्यफूल तेल | 95 रूपये | 100 रूपये | 5 रूपये |
| 8. | ज्वारी | 32 रूपये | 38 रूपये | 6 रूपये |
| 9. | कच्चे पोहे | 36 रूपये | 42 रूपये | 6 रूपये |
| 10. | मूग | 68 रूपये | 76 रूपये | 8 रूपये |

**संदर्भ ः सावतामाळी किराणा स्टोअर्स. अकलूज जि.सोलापूर**

तक्ता कमांक 1 नुसार काही निवडक वस्तूंपासुन मिळणारा नफा दर्शविला आहे. शेंगदाणे , शावुदाणा , मूग या पासून मिळणारा नफा हा जास्त म्हणजे 8 रूपये इतका आहे.त्या खालोखाल मिळणारा नफा हा तुरदाळ 7 रूपये , ज्वारी ,कच्चे पोहे 6रूपये गुळ 4रूपये इतका नफा मिळतो. या मध्ये सर्वात कमी नफा हा साखर या वस्तुला 2.40पैसे इतका मिळतो.

**समस्या ः**

1. *भांडवल समस्या* ः किराणा दुकानासाठी भांडवल उभा करण्यासाठीची समस्या निर्माण होते. बँक लोन साठी आवश्यक असणा-या जाचक अटी यामुळे ही समस्या निर्माण होते.
2. *जागेची समस्या* ः एखादया भागामध्ये किंवा मोठया बाजारपेठेत किराणा व्यवसाय सुरू करण्यास जागेची समस्या निर्माण होते.
3. *वाहतुक समस्या* ःकिराणा मालाची आयात करण्यासाठी येणारा खर्च हा जास्त असल्यास वाहतुक समस्या निर्माण होते.
4. *ऑनलाईन वस्तु विक्री* ः या धावपळीच्या जगात वेळेच्या अभावी लोकांना किराणा मालाची खरेदी करण्यासाठी ऑनलाईन वस्तुंची खरेदी केली जाते. त्यामुळे हा व्यवसाय सुरू करण्यासाठी ऑनलाई न वस्तु विक्री चा परिणाम या व्यवसायावर होतो. त्याची ही एक समस्या आहे.

- **निष्कर्ष ः**

  1. किराणा व्यवसाय हे एक उत्तम स्वयंरोजगाराचे उदाहरण आहे.
  2. हा व्यवसाय बेरोजगारांना रोजगार उपल्ब्ध करून आर्थिक मदत करतो.
  3. या व्यवसायामुळे किमान 2 बेरोजगारांना रोजगार उपल्ब्ध होतो.

- **संदर्भ ः**

  सावतामाळी किराणा स्टोअर्स अकलुज़ जि. सोलापुर.

# कृषी क्षेत्रातील स्वयंरोजगाराच्या संधी

**तुषार किसन जाधव**
**MA - I**

**प्रस्तावना :-**

समाजामध्ये मानवाला दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी प्रत्येक व्यक्ति विविध आर्थिक क्रियांमध्ये गुंतलेला आहे. जे लोक स्वत: व्यवसायाची स्थापना व व्यवस्थापन करतात. तसेच त्याचे एकूण उत्पन्न ते स्वत: घेतात त्याला स्वंयरोजगार असे म्हणतात. स्वयंरोजगारातून उत्पन्न मिळविण्यासाठी नवीन व्यावसायाची स्थापना करावी लागते. या व्यावसायाची सुरुवात करताना स्वत: व इतर व्यक्तिंची मदत घेता येते तसेच यातून मिळणारे उत्पन्न हे निश्चित नसते पण जो व्यवसाय चालू करतो, त्याचे एकून उत्पन्नावन पूर्ण अधिकार किंवा मालकी असते. सदय:स्थितीत वाढत्या बरोजगारीवर स्वयंरोजगारात वाढ करणे हा एक चांगला उपाय होऊ शकतो. व्यवसायात वृध्दी व पारदर्शकतेसाठी स्वंयरोजगार करणाऱ्या व्यक्तिने शिक्षण घेतलेले असणे अतिषय महत्वाचे असते. तसेच स्वयंरोजगार निर्मितीसाठी प्रचंड इच्छाशक्ती व काम करण्याची मानसिक तयारी असावी लागते.

भारतीय अर्थव्यवस्थेत शेती क्षेत्राला फार मोठा वाटा आहे. हे क्षेत्र श्रमकांसाठी अधिक रोजगार निर्मीतीचे एक केंद्र आहे. त्याचबरोबर शेती क्षेत्रामध्ये स्वयंरोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. जागतिकीकरणाच्या युगामध्ये शेती क्षेत्राचा विकास व शेती सलग्नीत स्वयंरोजगारात वाढ करणे आवश्यक आहे. शेती क्षेत्राला विकास मजबुत झाल्यास भारतीय अर्थव्यवस्थेचा सार्वंगीण विकास होऊ शकतो. संतुलीत विकासाच्या प्रक्रियेत शेतकरी व्यापारी आणि उत्पादक हे एकमेकांवर अवलंबून असून कृषी उत्पादनामध्ये वृध्दी करण्यासाठी वाणिज्य आणि नविन उदयोगाचा विकास केला पाहिजे आज ग्रामीण भागात लोकसंख्या वाढल्याने सुधारणा वेगाने कमी झाली आहे.

**(अ) उद्दिष्टये :-**

१) महाराष्ट्रातील मधुमक्षीपालन करणाऱ्यांचा अभ्यास करणे

२) महाराष्ट्रातील मधुमक्षीपालन करणाऱ्या उत्पादकांचा सामाजिक परस्थितीचा आढावा घेणे

३) महाराष्ट्रात मधुमक्षीपालन करणाऱ्या उत्पादकांच्या आर्थिक परस्थितीच्य अभ्यास करणे

**(ब) परिकल्पना** :-

१) महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी कृषी क्षेत्रात स्वंयरोजगार केल्यामुळे शेतकऱ्यांच्या राहणीमानात सुधारणा झाली आहे.

२) कृषी क्षेत्रात स्वयंरोजगार करणाऱ्या अनेक शेतकऱ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

**(क) अभ्यासाची व्याप्ती :-**

प्रस्तृत संशोधनासाठी महाराष्ट्रातील स्वयंरोजगार करणाऱ्या शेतकऱ्यांचा आर्थिक व सामाजिक विकास करणे हा विषय निवडला असून सदर विषयाचा अभ्यास गावापुरता मर्यादित नाही. महाराष्ट्रातील शेतकरी अनेक प्रकारचे स्वयंरोजगार करतात. .

**(उ) तथ्य संकलन :-**

१) प्राथमिक - प्रश्नावली निरिक्षण

२) दुय्यम - ग्रामपंचायतींची माहिती

प्रस्तृत संशोधन अहवाल हा संशोधनासाठी निवडलेली पद्धती आधार सामग्री, तथ्य, संकलन, नमुना निवड, संकलनाला मिळालेला प्रतिसाद इत्यादी घटकांव्दारे स्पष्ट केला आहे. वैज्ञानिक पद्धती हा संशोधनाचा मुख्य आधार आहे. प्रस्तृत संशोधनासाठी सर्वेक्षण पद्धतीची निवड केली आहे.

## कृषी क्षेत्रातील स्वयंरोजगाराच्या विविध संधी

**१) वृक्ष लागवड :-**

सर्वात प्रथम वृक्षाची लागवड केली पाहिजे शेती, घरे रस्ते व ज्या ज्या ठिकाणी वृक्ष लावता येतील त्या त्या ठिकाणी वृक्षाची लागवड केली पाहिजे वृक्ष लागवडीमुळे जमिनिची सुपीकता व जमिनी अंतर्गत पाण्याची पातळी वाढते. त्या फायदा शेती क्षेत्रासाठी होतो. आज जी दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यांचे कारण

वृक्षाचे प्रमान कमी झाले आहे हे एकच कारण नसून त्यासाठी अनेक कारणे आहेत. आजच्या आधुनिक जगामध्ये खुप प्रगती झाली आहे. मानव चंद्रावर मंगळावर जातोय परंतू पृथ्वीवरील समस्या कमी होण्याऐवजी वाढतच आहेत. वृक्ष लागवडीमुळे निरर्थक जमीनीचे पुरर्वसन होते त्याचबरोबर स्थानिक परिसरातील वातावरण स्वच्छ होते. अंबा, चिंच, नारळ, बोरे अशा विविध वृक्षांपासून पदार्थ निर्माण करता येतात व यापासून शेतकऱ्यांना उत्पन्न देखील मिळते.

**२) मधुमक्षीका पालन :-**

मधुमक्षीकापालन हा एक कमी खर्चीक व्यवसाय आहे. या व्यवसायामुळे शेतकऱ्यांना स्वयंरोजगार निर्माण होतो. मधुमक्षीका पालनामुळे शेतातल्या पिकांच्या उत्पादनात वाढ होते. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी एकत्र येऊन प्रकल्पाव्दारे मधुमक्षीकापालन केले पाहिजे. मधुमक्षीका पालनामुळे पिकांना उतारही जास्त पडतो. त्याच बरोबर मध देखील मिळतो. मधाचा वापर हा औषधासाठी केला जातो. त्याच बरोबर तो आरोग्यासाठी देखील चांगला असल्यामुळे मधाच्या उत्पादनात वाढ झाली तर शेतकऱ्याला त्यापासून एक स्वयंरोजगार निर्माण होतो.

| अ.क्र. | स्वयंरोजगार नाव | उपयोग |
|---|---|---|
| १ | मधुमक्षीपालन | आर्थिक उत्पन्न वाढीसाठी, औषधासाठी, स्मरनशक्ती, रक्तदाब न होणे तसेच इतर अनेक ठिकाणी उपयोग केला जातो. |

**३) कुकूट पालन :-**

शेतीला पुरक व्यवसाय कुकूट पालन हा एक चांगला व्यवसाय आहे. कुकूटपालन हा व्यवसाय पक्षी (कोंबडया) मोकळया सोडून किंवा पक्षी बंदिस्त करून केला जातो. अनेक शेतकऱ्यांनी मिळून हा बाजारामध्ये मालपुरवणे देखील सोपे होईल. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात देखील वाढ होईल व त्यातून स्वयंरोजगाराची निर्मिती होईल.

| अ.क्र. | स्वयंरोजगार नाव | फायदे |
|---|---|---|
| १ | कुकूटपालन | आर्थिक उत्पादनासाठी आणि शेतीमध्ये खताचा वापर केला जातो. पोष्टीक आहार मिळतो. |

**४) फळबाग :-**

लघु, मध्यम व मोठे भुसारणा क्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांनी आपल्या शेतीमध्ये मातीचे परीक्षण करून त्या मातीनुसार फळाची लागवड करावी उदा. पेरु, डाळींब, अंजीर, पपई, चिकू, केळी, आवळा, आंबा, चिंच, जांभूळ या फळांची झाडे लावावीत काही फळांचा वापर हा विविध पदार्थ तयार करण्यासाठी होता. उदा. केळीचे चिप्स, आंब्याचे लोणचे, आवळ्यापासून आवळा क्याडी असे अनेक पदार्थ आहेत जे कि फळांपासून निर्माण होत असतात. असे पदार्थ तयार करून शेतकऱ्यांनीच बाजारात विकावेत त्यामुळे शेतकऱ्यांना स्वयंरोजगार मिळेल.

**५) खताची निर्मीती :-**

आज वाढते प्रदुषण, संकरीत बियाणे व रासायनिक खतांच्या वापरामुळे अन्नधान्यांमध्ये देखील रासायनिक खतांचा अंश राहत आहे. त्यामुळे आज सेंद्रिय उत्पादनाच्या मागणीत वाढ होत आहे. सर्व गटातील शेतकऱ्यांनी मिळू सेंद्रिय खत निर्मिती क्रेंद्र निर्माण करून त्या ठिकाणी तज्ञाच्या मार्गदर्शनाखाली खतांची निर्मिती करावी यामुळे स्वयंरोजगारही निर्माण होईल व शेतीही चांगली राहून पिकाच्या क्षमतेत वाढ होईल. सेंद्रिय खंतामध्ये महत्वाचे खते म्हणजे शेणखत, कंपोस्ट खत, हिरवळीची खते, गांडुळ खते या खतांचा वापर करून नैसर्गिक पिकांची लागवड केल्यामुळे शेतीतील उत्पादनाला मागणी वाढेल.

**६) लघु प्रकिया :-**

शेतकऱ्यानी आपल्या शेतीमध्ये सोयाबीन, सुर्यफुल करडी, शेंगदाने अशा तेलबियाची लागवड करावी यापासून तेल निर्मिती करावी तेल निर्मितीसाठी जे भांडवल लागणार आहे. ते भांडवल सर्व शेतकऱ्यांनी मिळून खरेदी करावे. जर पैशाची गरज लागली. तर लघु उदयोगासाठी बँक कर्ज देतात. त्यातून तेल निर्मितीसाठी जी सामग्री

लागेल त्याची खरेदी करावी. यामुळे शेतकऱ्यांना देखील स्वयंरोजगार निर्माण होईल व उत्पन्नात देखील वाढ होईल व स्थानिक लोकांना देखील स्वयंरोजगार मिळेल.

**निष्कर्ष :-**

प्रस्तुत लेखामध्ये कृषी क्षेत्रातील स्वयंरोजगाराच्या नविन संधी शोधण्याचा प्रयत्न केला आहे. कृषी क्षेत्रात स्वयंरोजगाराच्या वेगवेगळ्या संधी उपलब्ध आहेत. दुग्धव्यवसाय, फळबाग, वृक्ष लागवड, मधुमक्षीका पालन खंताची निर्मिती, कुकूटपालन, लघु प्रक्रिया उदयोग आणि वितरण केंद्र निर्माण करणे यामध्ये स्वयंरोजगाराच्या संधी आहेत तसेच ग्रामीण भागातील बेरोजगारांना स्वयंरोजगाराच्या कृषी संबंधीत असल्याने याचा फायदा हा प्रामुख्याने शेतकऱ्यांना झाला आहे.

**शिफारशी :-**

शासनाने कृषी क्षेत्रात स्वयंरोजगारासाठी कृषी क्लिनिक आणि कृषी व्यवसाय केंद्राची स्थापना केली पाहिजे. तसेच कृषीमधील सार्वजनिक गुंतवणुकीच्या माध्यमातून जलसिंचन जमिन विकास, ग्रामीण रस्ते, बाजार यंत्रणा सेंद्रिय शेती या सुविधा पुरविल्या पाहिजेत, शासनाच्या स्वयंरोजगारासाठी असलेल्या योजनांची माहिती घेतली पाहिजे.

# स्वयंरोजगार निर्मितीत बेकरी व्यवसायाची भुमिका

**चव्हाण ज्योती वसंत**

**MA - I**

---

**प्रस्तावना :-**

भारतासारख्या विकासाकडे वाटचाल करणाऱ्या विकसनशील देशाला सर्वात मोठा प्रश्न भेडसावत असतो तो म्हणजे बेरोजगारीचा प्रचंड लोकसंख्या भांडवलाची कमतरता, आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव कौशल्याचा अभाव, निरक्षरता यांमुळे ग्रामीण तसेच शहरी तरूण नोकरीच्या शोधात धाव घेता व बेरोजगारीच्या चक्रात अडकून पडतो. या अशा संकटाला तोंड देण्यासाठी 'स्वयंरोजगार' एक महत्त्वाचा व्यवसाय ठरतो आहे.

"स्वयंरोजगार" म्हणजे स्वत:साठी स्वत:च रोजगार निर्माण करणे होय." असा रोजगार जो कि उत्पन्न मिळवून देऊन लोकांच्या गरजा भागवून रोजगार निर्मिती करेल.

स्वयंरोजगार विविध योजनांचा लाभ घेऊन युवंकाना स्वयंरोजगारासाठी प्रेरीत करणे गरजेचे आहे. प्रत्येक घटकाला रोजगार मिळवून देणे सरकारला शक्य होत नाही. त्यामुळे लोकांनी स्वयंरोजगाराकडे वाटचाल केली पाहिजे. देशाच्या ग्रामीण तसेच शहरी भागातही जोमाने केला जाणारा व्यवसाय किंवा सध्या वाढत असणारा व्यवसाय म्हणजे 'बेकरी व्यवसाय होय. मोठया प्रमाणात शहरी भागात भरभराटीस आला आहे. सध्याच्या बदलत्या जिवनशैलीत, धकाधकीच्या जीवनात तसेच आधुनिक नवयुगात आहारशैलीत मोठया प्रमाणात बदत झालेले दिसुन येतात. मोठया प्रमाणात बाजारात बेकरी पदार्थांना मागणी वाढलेली दिसून येते. देशाच्या ग्रामीणही भागात हा व्यवसायाचे प्राबल्य दिसून येते.

थोडक्यात या कार्यक्षेत्राचे देशाच्या रोजगार निर्मिती व दारिद्रय निर्मुलन तसेच अर्थव्यवस्थेत आर्थिक उत्पन्न मिळवणारे महत्त्वाचे साधन ठरत आहे.

**(अ) उद्दिष्टये :-**

१) बेकरी व्यवसायाचा अभ्यास करणे.

२) बेकरी व्यवसायामुळे निर्माण होणाऱ्या स्वयंरोजगाराचा आढावा घेणे.

**(ब) प्रस्तुत शोध निंबधाची गृहीतके**

१) रोजगार वृदधीस बेकरी व्यवसाय हातभार लावतो.

२) इंदापूर परिसरात मोठया प्रमाणात रोजगार निर्मिती झाल्याचे दिसून येते.

**माहिती संकलन :-**

प्रस्तुत विषयाचा अभ्यास करण्यासाठी प्राथमिक तसेच व्दितीय पद्धतीने माहिती गोळा करण्यात आली आहे.

१) इंदापूरमधील मनिषा बेकरी या दुकान मालकांची मजुऱ्यांची मुलाखत घेतली आहे.

२) इंटरनेव्दारे दुय्यम माहितीच्या आधारे माहिती संकलित केली आहे.

**स्वयंरोजगार :-**

शिक्षणानंतर सर्वच जण नोकरीच्या शोधात असतात पण पुष्कळदा शैक्षणिक योग्यतेची नोकरी मिळत नाही अशा परिस्थितीत स्वयंरोजगार हा एक चांगला पर्याय ठरू शकतो. स्वयंरोजगार या शब्दाचा अर्थ स्वत:च स्वत:साठी रोजगार उपलब्ध करणे आणि त्याद्वारे अर्याजन करणे असा होतो. नोकरी न करता स्वयंरोजगाराचा मार्ग पत्करणाऱ्यांची खरेतर खुप कमी आहे. याचे एक कारण म्हणजे समाजामध्ये स्वयंरोजगाराकडे पाहण्याचा दृष्टीकोन तितकासा सकारात्मक नाही. त्यामुळे आणि योग्य माहिती अभावी आजही स्वयंरोजगारापेक्षा नोकरीलाच प्रधान्य दिले जाते.

खरे तर योग्य मार्गदर्शन आणि कठोर परिश्रमाची जोड मिळाल्यास स्वयंरोजगाराच्या माध्यमातून स्वत:बरोबर इतरांनाही रोजगाराची संधी निर्माण करणे शक्य आहे. स्वाभिमानाने स्वत:चा आर्थिक विकास साधायचा असेल तर स्वयंरोजगारासारखा दुसरा चांगला मार्ग नाही.

**विश्लेषन :-**

**अ बेकरी व्यवसायाचे टप्पे :-**

**१) बेकरी - इतिहास :-**

पूर्वी तृणधान्याचे ती गोळा करून ते भाजून खाणे ही चालत आलेली प्रक्रिया आहे. पाव भाजण्याची बंदपात्रे तयार जाड केक व लादया तयार करणे शक्य झाले आहे

ग्राहकानी पाव भाजण्याच्या प्रक्रियेचा शोध लावला पहिल्यांदा इजिप्शियन लोकांनी इ. स. पूर्व २६०० मध्ये शोधले त्यांनी पाव फुगवण्याचे तंत्र शोधुन काढले.

पाव फुगवण्याची १ लीटर भटटीपण त्यांनीच शोधली अमेरिकेत १९६० च्या सुमारास खादयपदार्थ उदयोगात बेकरी उदयोगाचा दुसरा क्रमांक होता.

**(ब) बेकरी पदार्थ बनवण्याची क्रिया / कृती :-**

**२) घटक :-**

**i) फुगवणकारक :-** बहुतेक बेकरी उत्पादनांस फुगवणकारक वापरतात हि क्रिया यीस्ट व सुक्ष्मजंतुजन्य किणनाने रासायनिक विक्रेयेव्दारे वायूच्या कणकीतील अंत:क्षेपणाव्दारे केली जाते.पीस्टमुळे ग्लुकोज, कुकिज, बिस्किटे व इतर अनेक बेकरी उत्पादने खाण्याचा सोडयामुळे निर्माण होणाऱ्या कार्बन डायऑक्साईडव्दारे फुगविली जातात.

**ii) मोहन :-** बहुतेक सर्व बेकरी उत्पादनांसाठी तेल व मेदे / स्निग्ध पदार्थ आवश्यक असतात.

**iii) पाणी :-** पाणी हे सर्वात जास्त प्रमाणात वापरतात. कणीक तयार करताना पाण्यामुळे ग्लुटेनाचे हायड्रेड तयार होऊन स्पंजी कोशिकीय जाळी तयार होते.

**iv) अंडी :-** अंडयातील बलकात घनभाग ५०% त्यापैकी ६०% व जास्त भागपायसीकृत मेदाचा असतो त्यामुळे रंग, स्वाद पोत यासाठी उपयोग होतो.

**(क) प्रक्रिया :-**

१) द्रव स्पंजातील घटकांचे मापण

२) द्रव स्पंजातील घटकांचे मिश्रण

३) द्रव स्पंजातील किण्वन

४) द्रव स्पंजाचे शीतन

५) कणकीचे मिश्रण

६) कणकीचे विकसन

७) बहि : सारण व विभाजन

८) भाजणे

९) शीतन

१०) काप करणे

**(ड) बेकरी उत्पादनांचे प्रकार :-**

१) पाव, रोल व तत्सम पदार्थ

२) बिस्किटे

३) केक, पेस्ट्रीज व इतर उत्पादने

४) न फुगविलेली उत्पादने

**कच्च्या माला वरील खर्च**

| अ.नु | वस्तू | एक दिवसाचा वापर | किमंत प्रति (किलो) | महिन्याचा खर्च (३० दिवस) | वर्षाचा खर्च (१२ महिने) |
|---|---|---|---|---|---|
| १ | साखर | १ किलो | ३५ | १०५० | १२,६०० |
| २ | मैदा | १५ किलो | ३० | १३,५०० | १,६२,००० |
| ३ | डालडा | १/२ किलो | ७० | १०५० | १२,६०० |
| ४ | यीस्ट | १/२ किलो | १२० | १८०० | २१,६०० |
| ५ | आटा | ३० किलो | २४ | ३६००० | ४,३२,००० |
| | | कच्च्या मालाचा एकूण खर्च = | | | ६,४०,००० |

**इतर खर्च**

| इरत खर्च | महिन्याचा खर्च | वर्षाचा खर्च |
|---|---|---|
| गाळाभाडे | ४००० | ४८,००० |
| मजुरीवरील खर्च | २७००० | ३,२४,००० |
| लाईट बील खर्च | ६००० | ७२,००० |
| इतर खर्च (विष्टन) | ५००० | ६०,००० |
| **एकूण खर्च =** ६,४०,८०० + ५,०४,०००= १०,४४,८०० | | |

कच्च्या मालावरील एकूण तसेच इरतखर्च आपण तक्यात समावेश केलेला आहे.

**एकूण उत्पादन**

| अ क्र. | उत्पादनाचे नाव | दिवसाचे उत्पादने | १ नगांचे उत्पादन | दिवसाचे उत्पादन | महिन्याचे उत्पादन | वर्षाचे उत्पादन |
|---|---|---|---|---|---|---|
| **१** | पाव | ११० लादी | ४० | ४४०० | १,३२,००० | १५,८४,००० |
| **२** | केक | ५ किलो | १०० | ५०० | १५,००० | १,८०,००० |
| **३** | नॉनकेट | २ किलो | ६० | १२० | ३६०० | ४३,२०० |
| **४** | बिस्किट | ५ किलो | ८० | ४०० | १२००० | १,४४,००० |
| | | | | **एकूण उत्पादन =** | | **१९,५१,२००** |

एकूण उत्पन्न = एकूण उत्पादन - उत्पादन खर्च

१९,५१,२०० - १०,४४,८००

एकूण उत्पन्न = ९,०६,४००

मालकाला एकूण कच्चामाल व इतर खर्च यातून मिळणारे एकूण उत्पन्न वजा केले असता ९,०६,४०० रूपये एवढी शिल्लक रक्कम उरते हे त्याचे वार्षीक उत्पन्न आहे. यातून आपल्याला बेकरी व्यवसाय हा स्वयंरोजगार उपलब्ध करून देणारा व्यवसाय दिसून येतो. यातून स्वयंरोजगारास चालना मिळते.

**(इ) मर्यादा / समस्या :-**

१) सुक्ष्मजीव संसर्ग व अन्य कारणांनी होणारी खराबी.

२) बेकरी उत्पादनांच्या घटक पदार्थानुसार उत्पादनातील आद्रतेचे प्रमाण १२ ते १४% पेक्षा कमी राखल्यास पीस्ट बुरशी, सुक्ष्मजीव यांची वाढ पूर्णपणे रोखली जाते.

३) पावाचे कवक व बुरशीपासून संरक्षण करणे.

४) जास्त वेळ राहील्यास त्यावर तार चढते.

५) बेकरी पदार्थ आंबवलेले असल्यामुळे लवकर खराब होण्याची शक्यता असते. त्यामुळे ते लवकरात लवकर विक्रिसाठी पाठवावे लागतात.

**(ई) शिफारसी :-**

१) ग्रामीण भागात भांडवल टंचाईमुळे तसेच विविध शासकीय लघुउदयोग प्रोत्साहीत करणाऱ्या कर्ज, योजना, अनुदाणे यांची माहिती करणे व व्यवसाय वृदधी घडवून आणणे.

२) नवनवीन बेकरी तंत्रज्ञानाचा अवंलब करणे जे की कमी वेळेत जास्त उत्पादन मिळवून देईल.

३) कौशल्यपूर्णरित्या रंग, पोत, आकार, वेष्टन तसेच जाहिरात या मार्गाचा वापर करून व्यवसायाची प्रसिदधी करणे तसेच आकर्षक रचना करणे

४) ग्राहकांच्या पसंतीक्रमानुसार उत्पादन संरचनेत काळानुसार रुप बदल करणे व नवनवीने कल्पनांचा विचार करणे.

**(उ) निष्कर्ष :-**

१) इंदापूर या शहरातील बेकरी व्यवसाय लोकप्रिय असल्याचे जाणवते.

२) महीलाही हा व्यवसाय स्वतंत्र्यरित्या करताना दिसून येतात.

३) स्वंयरोजगारात बेकरी व्यवसाय आधुनिक, बदलत्या तसेच धकाधकीच्या जिवणात अतिशय महत्त्वाचे स्थान असून त्यातून मोठया प्रमाणात आर्थिक उत्पन्न मिळून पुरेशा प्रमाणात रोजगार निर्मीती होताना दिसून येते.

४) स्थानिक बाजारा दिवशी या बेकरी उत्पादनाला लोक मोठया प्रमाणात खरेदी करताना दिसून येते

५) वडापावचे स्टॉल, स्वीट होम, हॉटेल यामध्ये बेकरी उत्पादनाला मोठी मागणी असल्याचे दिसून आले.

**संदर्भ ग्रंथ सुची :-**

१) प्रत्यक्ष बेकरी व्यवसायाला भेट देऊन मुलाखतीव्दारे माहिती मिळवली.

२) इंटरनेट वरून गुगलवर सर्च करून इतर माहिती मिळवली.

३) www.Bakaryporduct.com










05/02/14
कला विज्ञान व वाणिज्य
विभाग















# फूड इंडस्ट्रीत विद्यार्थ्यांना व्यावसायिक संधी

## राजवर्धन पाटील : फूड फेस्टिव्हलमध्ये ९० हजारांची उलाढाल

इंदापूर, दि. ३ (प्रतिनिधी) - विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबर इतर कौशल्य आत्मसात करणे आवश्यक आहे. तसेच या आधुनिक युगात पर्यटन व्यवसायाचा विकास व विस्तार वेगाने होत आहे. त्यामुळे फूड इंडस्ट्री या क्षेत्रात विद्यार्थ्यांना व्यवसायाच्या नवीन संधी निर्माण होत आहेत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक संस्था व त्यामध्ये राबविण्यात येणारे उपक्रम हे सर्वांगीण विकासासाठी आवश्यक आहेत, अशी माहिती नीरा भीमा सहकारी साखर कारखान्याचे संचालक व भाजपचे युवक नेते राजवर्धन पाटील यांनी दिली.

इंदापूर : येथील महाविद्यालयात फूड फेस्टिव्हलचा प्रारंभ करताना भाजपचे युवक नेते राजवर्धन पाटील व मान्यवर.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे विद्यार्थी विकास मंडळ आणि इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय इंदापूर विद्यार्थी विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या फूड फेस्टिवलचे उद्घाटन राजवर्धन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. या फूड फेस्टिवलमध्ये ५९ स्टॉलधारक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. जवळपास ८० ते ९० हजार रुपयांची उलाढाल झाली असल्याची माहिती समन्वयक डॉ. तानाजी कसबे यांनी दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडासंचालक डॉ. भरत भुजबळ यांनी केले. डॉ. शिवाजी वीर यांनी आभार मानले.

प्रभात PuneDistrict, 04 Mar 2023, Page 007
https://epaper.dainikprabhat.com



सकाळ

# इंदापूर महाविद्यालयात फूड फेस्टिव्हल

इंदापूर, ता. ३ : "युवकांनी शिक्षणाबरोबर इतर कौशल्य आत्मसात करणे आवश्यक आहे. या आधुनिक युगात पर्यटन व्यवसायाचा विकास व विस्तार वेगाने होत आहे. त्यामुळे फूड इंडस्ट्री या क्षेत्रात विद्यार्थ्यांना व्यवसायाच्या नविन संधी निर्माण होत आहेत. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक संस्था व त्यामध्ये राबविण्यात येणारे उपक्रम, हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक आहेत," असे प्रतिपादन नीरा भीमा सहकारी साखर कारखान्याचे संचालक राजवर्धन पाटील यांनी केले.

इंदापूर : फूड फेस्टिव्हलच्या उद्‌घाटनप्रसंगी उपस्थित युवा नेते राजवर्धन पाटील व इतर मान्यवर.

सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे, विद्यार्थी विकास मंडळ आणि इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय इंदापूर, विद्यार्थी विकास मंडळ यांच्या वतीने इंदापूर येथे आयोजित फूड फेस्टिवलचे उद्‌घाटन राजवर्धन पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यासारख्या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांबरोबरच शिक्षक आणि पालकांनीदेखील सहभाग वाढवावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जीवन सरवदे यांनी या उपक्रमाच्या निमित्ताने छोट्या व्यवसायातून उद्योगाच्या प्रेरणा विकसित व्हाव्यात, विद्यार्थ्यांना व्यावसायिक अनुभव मिळावा, हा उद्देश असल्याचे सांगितले.

या फूड फेस्टिव्हलमध्ये ५९ स्टॉलधारक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. जवळपास ८० ते ९० हजार रुपयांची [illegible] झाल्याची माहिती या उपक्रमाचे आयोजक व विद्यार्थी विकास मंडळाचे समन्वयक डॉ. तानाजी कसबे यांनी दिली. क्रीडासंचालक डॉ. भरत भुजबळ यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. शिवाजी वीर यांनी आभार मानले.

Pune Baramati Today
04/03/2023 Page No. 3



लोकमत

# इंदापूर महाविद्यालयात फूड फेस्टिव्हल, ९० हजारांची उलाढाल

लोकमत न्यूज नेटवर्क

इंदापूर : इंदापूर महाविद्यालयाने आयोजित केलेल्या फूड फेस्टिव्हलमध्ये सुमारे ८० ते ९० हजार रुपयांची उलाढाल झाली. या फेस्टिव्हलमध्ये ५९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता, अशी माहिती प्राचार्य डॉ. जीवन सरवदे यांनी दिली.

ते म्हणाले की, छोट्या व्यवसायातून उद्योगाच्या प्रेरणा विकसित व्हाव्यात. विद्यार्थ्यांना व्यावसायिक अनुभव मिळावा, यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे विद्यार्थी विकास मंडळ व इंदापूर महाविद्यालयाच्या इंदापूर विद्यार्थी विकास मंडळाच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. राजवर्धन पाटील यांच्या हस्ते त्याचे उद्‌घाटन करण्यात आले.

इंदापूर महाविद्यालयात फूड फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले होते.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे विद्यार्थी विकास मंडळ व इंदापूर महाविद्यालयाच्या इंदापूर विद्यार्थी विकास मंडळाच्या संयुक्त विद्यमाने फूड फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले होते. राजवर्धन पाटील यांच्या हस्ते त्याचा उद्‌घाटन करण्यात आले. क्रीडासंचालक डॉ. भरत भुजबळ यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. शिवाजी वीर यांनी आभार मानले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी विद्यार्थी विकास मंडळाचे समन्वयक डॉ. तानाजी कसबे व त्यांच्या सहकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

Hello Pune Gramin
Page No. 8 Mar 04, 2023
Powered by: erelego.com